सायंदैनिक
प्राजक्त
संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी



श्रीपरशुराम



श्रीकोळेश्वर



श्रीयोगेश्वरी

भावे मित्र मंडळाचे द्वै मासिक

‘भावे-प्रयोग’

भावे मित्र मंडळ
एक परिवार

भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक फेब्रुवारी, २०२३

# ‘स्वप्नील’ जॅकरांडा आणि ‘आगळा’ कैलासपती

## नववर्ष

सरले जुने वर्ष. आले नवीन वर्ष.
उरी दाटला हर्ष
सर्वांच्या जीवनी होवो
यशाचा उत्कर्ष.

**अमृत नंदकुमार भावे. ठाणे. ९९२००१६०७०**

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.
छायाचित्रे – डॉ.सरिता विनय भावे, मुंबई.

### ‘स्वप्नील’ जॅकरांडा

लाल, गुलाबी, पिवळ्या, पांढऱ्या फुलांची झाडे आपल्यासाठी नेहमीची असल्यामुळे आकाशाच्या निळ्या पार्श्वभूमीवर, हिरव्या पानांसोबत निळ्या-जांभळ्या फुलांचा पिसारा मिरवणारा ‘जॅकरांडा’ त्याच्या वेगळेपणामुळे बघताक्षणी थेट हृदयातच शिरतो! आल्हाददायक, शीतल फुलांमुळे ‘शोभेचा वृक्ष’ म्हणून जगभर त्याची ख्याती आहेच. असंख्य जॅकरांडांमुळे खुलून दिसणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील ‘प्रिटोरिया’ शहराला कौतुकाने ‘जॅकरांडा सिटी’ म्हणतात तर ऑस्ट्रेलियातील ‘ग्रॅफ्टन’ शहर ‘जॅकरांडा फेस्टिवल’साठी सुप्रसिद्ध आहे. मूळच्या दक्षिण अमेरिकेतील या झाडाला ‘ब्ल्यू जॅकरांडा, ब्लॅक पुई, फर्न ट्री’या नावांनीही ओळखतात. *Jacaranda mimosifolia* नावाच्या, आपल्यासाठी ‘पाहुणा’ असलेल्या या वृक्षासाठी ‘नीलमोहर’ असे नितांतसुंदर देशी नाव सुचवणाऱ्या व्यक्तीच्या रसिकतेला भरभरून दाद द्यायलाच हवी, कारण फुले नसताना पानातील साम्यामुळे हा ‘गुलमोहर’ वृक्षासारखाच वाटतो (परंतु या दोघा झाडांची वनस्पतीशास्त्रीय ‘कुळे’ मात्र वेगवेगळी आहेत).



या झाडाचे खोड राखाडी-काळपट, उभ्या रेषांचे, खडबडीत असते. पाने हिरवी, छोट्या झावळीसारखी वाटतात. संयुक्त पानांच्या मध्यशिरेच्या दोन्ही बाजूला, जोडीजोडीने, नाजुक, टोकदार पर्णिका असून टोकाला एकच पर्णिका असते. हिवाळ्यात पानगळ झाल्यावर वसंतऋतूच्या आगमनाच्या वेळी हा बहरायला लागतो. झाडाला फुटभर लांबीच्या मंजिऱ्या येतात आणि असंख्य निळ्या-जांभळ्या फुलांनी त्या लगडून जातात. अशा वेळी झाड अगदी खुलून दिसते. एकत्र जुळलेल्या पाच पाकळ्यांची फुले घंटीसारखी वाटतात. फुलांचा सुवास खूपच मंद असतो. पण फुलांतील परागकण गोळा करणारे माव्यासारखे कीटक मधासारखा गोड-चिकट द्रवपदार्थ पाकळ्यांवर सोडतात, त्यामुळे जॅकरांडा असलेला परिसर गोडसर वासाने परिमाळतो. झाडांच्या तळाशी झालेल्या फुलांच्या पखरणीमुळे काही काळ रम्य वाटले तरी नंतर फुले कुजल्यावर पायवाटा चिकट, घाण होऊन स्वच्छता राखणे त्रासदायक ठरते. फुलांचा बहर संपल्यावर लागणाऱ्या शेंगा गोलाकार, चपट्या पुरीसारख्या असतात. या पुऱ्या आधी हिरव्या, मग तपकिरी आणि नंतर लाकडासारख्या कठीण होतात. त्या दोन भागात उकलल्यावर पातळ, हलक्या बिया बाहेर पडतात आणि ही कवचे मात्र झाडावर तशीच लटकलेली राहतात.

मराठी विश्वकोश (खंड ५) नुसार, दक्षिण अमेरिकेत या झाडाच्या साली व पानांचा उपयोग, लघवी करताना वेदना/त्रास होत असल्यास करतात. पानांचा फांट (काढा) हृद्रोगावर देतात आणि चूर्ण जखमेवर लावतात. सालींचा फांट जखमा धुण्यास वापरतात. होमियोपॅथी उपचार पद्धतीत जॅकरांडा प्रजातीतील झाडापासून मिळालेले ‘टिंक्चर’ पुरुषांच्या लैंगिक समस्या, संधिवात आणि इतर रोगलक्षणे यावर उपयुक्त मानले जाते.

‘आंतरजाला’वर जॅकरांडाशी निगडीत इतर देशातील रंजक आख्यायिका वाचायला मिळतात आणि मानवाचे वृक्षांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचे वैश्विक सत्य जाणवते. एक कथानक असे आहे की ॲमेझॉन नदीच्या परिसरात जॅकरांडाच्या झाडावर राहणारी चंद्रलोकातील एक राजकन्या नंतर झाडावरून खाली उतरून गावकऱ्यांच्या सोबत रहायला लागते. गावातील साध्याभोळ्या लोकांना ती स्वत:कडील ज्ञान आणि नीतीतत्त्वे तर देतेच शिवाय चांगले-वाईट यातील फरकही त्यांना नीट समजावून सांगते. ज्ञानदानाचे आपले हे कार्य पूर्ण केल्यावर राजकन्या पुन्हा जॅकरांडाच्या फुलांमध्ये रहायला जाते. तेव्हापासून जॅकरांडाला ‘ज्ञानाचे’ प्रतीक मानले जाते. युरोप-

(पान क्र. ४ वर)

# संपादकीय

भावे मित्र मंडळाचे संमेलन यंदाचे वर्षी होणार नाही, त्यामुळे दर वर्षी संमेलनात होणारी वार्षिक सर्वसाधारण सभा या वर्षी झूम या मिटिंग ॲप वरून घेण्याचे नक्की केले आहे. भावे मित्र मंडळाच्या सर्व सभासदांनी पान क्र ३ वर दिलेल्या सूचना वाचून सभेला उपस्थित रहावे ही विनंती.

Unsung Heros गाऊ त्यांना आरती! या लेखमालिकेतून भावे कुलात आपल्या कार्यकर्तृत्त्वाने विविध क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटवला अशा व्यक्तींची माहिती देण्याच्या या उपक्रमाला वाचकांची पसंती असल्याचे त्यांच्या प्रतिक्रियांमुळे/येणाऱ्या फोनमुळे लक्षात येते आहे. अनेक अलौकिक, दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या भावे कुलातील व्यक्ती केवळ प्रसिद्धीचे कोंदण न लाभल्यामुळे विस्मृतीत गेल्या. अशा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणे हे या सदराचे महत्त्व आहे. कुलवृत्तांतात आपल्या घराण्यातील अशा व्यक्तींचा नुसता नामोल्लेख किंवा साधा परिचय असेल अशांनी त्यांची माहिती आम्हास पाठवावी, म्हणजे ती पुढील अंकांमधून प्रकाशित करता येईल.

'उद्योजक म्हणून घडताना' ही भाव्यांमधील व्यावसायिकांनी आपण व्यवसाय का करू लागलो, त्या मागची प्रेरणा कोणाची, व्यवसाय करताना अडचणी काय आल्या अशा अनुभव कथनाची ही लेखमाला आहे. आपल्याच उद्योगाची माहिती कशाला द्यायची, किंवा कशी द्यायची असा विचार न करता अशी माहिती जरूर लिहून पाठवावी. आपले व्यावसायिक अनुभव मराठी, इंग्रजी, हिंदी या कोणत्याही भाषेतून साधारण १००० ते १२०० शब्दांत लिहून bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावेत. व्यवसायात नव्याने येणाऱ्या भावी पिढीसाठी हे अनुभव निश्चित मार्गदर्शक ठरतील. अनेकांना लिखाणाची सवय नसते अशांनी ऑडियो रेकॉर्डिंग करून ते पाठविल्यास त्यावरूनही लेख तयार करून घेता येईल.

'भावे-प्रयोग'या प्राजक्ततर्फे प्रकाशित होणाऱ्या अंकात आपला सहभाग लिखाणाच्या रूपाने हवा आहे. आपल्यात सिद्धहस्त लेखक आणि कवी आहेत, त्यांचेही साहित्य प्रकाशित करायची संधी मिळावी असे आवाहन याद्वारे मी करीत आहे. अनेकांना मी भेटत असतो, त्यावेळी त्यांना तुम्ही तुमच्या पद्धतीने लिहून द्या, त्यावर संपादकीय संस्कार करून, लिखाण व्यवस्थित करून घेईन असे मी सांगत असतो. त्यामुळे आपल्याला सुचलेल्या विषयावरील लिखाण जरूर पाठवावे, ही विनंती.

**अभय शंकर भावे**

९४२२३०६०३३ Whats App / ७०२०६४५८९२

पोस्टाने अंक न मिळण्याचे प्रमाण भरपूर आहे. अंक ई मेलने पाठविण्याचा प्रयोग चांगलाच यशस्वी ठरतो आहे. असाही एक सूर ऐकू आला की व्हॉटस् ॲपवर अंक पाठवा, पण ते शक्य नाहीये हे लक्षात घेऊनच ई-मेलचा मार्ग निवडला आहे. कुटुंबातील सर्वांचे मेल ॲड्रेस पाठवावेत. अजूनही अनेकांचे मेल ॲड्रेस उपलब्ध झालेले नाहीत, तरी आपले मेल ॲड्रेस bhave1956@gmail.com या मेलवर कळवावेत म्हणजे पुढील अंक मेलनेही पाठवता येतील. मेल करताना आपल्या संपूर्ण नावासह पूर्ण पत्ता व फोन नंबरही कळवावा.

## अंकाबद्दल प्रतिक्रिया

श्री. अभय भावे,
नमस्कार,

आपण पाठवलेला खूप माहितीपूर्ण व वाचनीय असलेला १६ पानी अंक मिळाला. खूप खूप धन्यवाद.

**अनिल भावे,गोरेगाव.**

---

DEAR MR. ABHAY RAO,
THE NOVEMBER 2022 ISSUE IS NICE.
OBLIGED FOR INCLUDING MY LETTER OF APPRECIATION AND SHORT ARTICLE : NOMINEE - TRUSTEE OR OWNER. WITH WARM REGARDS.

**DINKAR PARSHURAM BHAVE, MUMBAI.**

## श्री. उमा महेश्वर भावे फाऊंडेशन (रजिस्टर्ड)

'श्री रक्षा', गुडीकेरी, श्री रंगनाथ मंदिराजवळ,
सोरब ५७७४२९ जि. शिवमोग्गा.

शिवमोग्गा, ता. जि. सोरब येथे श्री रंगनाथ मंदिराजवळ श्री उमामहेश्वर मंदिर आहे. खूप वर्षांपूर्वी देशावरील लिमये कुटुंबातील कन्येचा विवाह येथे भावे कुटुंबातील मुलाशी संपन्न झाला. त्याच वेळी लिमये ह्यांनी पिण्याच्या विहिर व उमामहेश्वर मंदिर बांधले असा उल्लेख आहे. भावे कुटुंबातील श्री. सूर्यनारायण भावे आणि कुटुंब मंदिराची पूजा, अभिषेक, दीपोत्सव हे सर्व यथासांग करीत होते. सध्याच्या काळात मंदिराची संपूर्ण जबाबदारी सोरबच्या समस्त भावे कुटुंबियांनी स्वीकारली आहे. त्या करिता श्री उमामहेश्वर भावे फाऊंडेशनची स्थापना केली आहे.

३-४ वर्षांपूर्वी मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मंदिराची जागा सोडावी लागली. खूप वर्ष जुने मंदिरही जीर्ण झाले होते. मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा अशी सोरबच्या सर्व भावे कुटुंबाची इच्छा होती.

समस्त पुरोहितांच्या सल्ल्यानुसार मंदिर निर्माण करण्याचे ठरविले व त्या करिता श्रीक्षेत्र धर्मस्थळ, श्रीक्षेत्र वरदहळ्ळी व श्रीक्षेत्र सोंदामठ ह्या सर्वांच्या कृपाशिर्वादाने शिलामय मंदिर निर्माण केले गेले. मंदिराचे तीन भागात विभाजन केले आहे. १) गाभारा २) नंदी असलेली जागा ३) घंटामंडप व त्याच बरोबर शिलामय गणपतीची मूर्ती व देवीची मूर्ती यांची प्रतिष्ठापना झाली आहे. ह्यासाठी आत्तापर्यंत एकूण पंचवीस लाख रुपयांचा खर्च झाला आहे.

आता शिलामय घंटामंडप, मुख्यद्वार, फरशी(फरसबंद) मंदिराभोवती कुंपण आणि सभामंडप यासाठी एकंदर पन्नास लाख रुपयांची गरज आहे. येत्या दिवसात श्री उमा महेश्वर भावे फाऊंडेशन हा ट्रस्ट फक्त धार्मिक कार्यक्रमासाठी मर्यादित न राहता बहुपयोगी सभाभवन निर्माण करून शैक्षणिक, सांस्कृतिक, कला असे विकासोपयोगी कार्यक्रम करणार आहे. **सर्व भावे कुलातील कुलबंधूंना व सर्व भक्तांना अशी विनम्र विनंती की या कामासाठी उदार मनाने श्री उमामहेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामासाठी मदत करावी. रक्कम ट्रान्सफर करण्यासाठी बँक अकौंट डिटेल्स खाली दिले आहेत.**

**अध्यक्ष/पदाधिकारी**
**श्री उमा महेश्वर भावे फाऊंडेशन(रजिस्टर्ड)**

Account - Shri Umamaheshwar Bhave Foundation(Reg.)
Canara Bank, Branch Sorab.
Saving A/C No - 0573101029333
IFSC - CNRB0000573

# भावे मित्र मंडळ एक परिवार

**नोंदणीकृत कार्यालय** – १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४
**नोंदणी क्र** – महाराष्ट्र/३५७/२००६/पुणे दि. २१.०२.२००६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांच्या संमतीने या वर्षीची वार्षिक सर्व साधारण सभा व शिक्षण निधीबद्दल खालील निर्णय घेण्यात आले. या वर्षी भावे कुल संमेलन घेणे शक्य झाले नाही हे लक्षात घेऊन भावे मित्र मंडळाची सोळावी वार्षिक सर्वसाधरण सभा, शनिवार, दि. २५ मार्च, २०२३ या दिवशी संध्याकाळी, ठीक ७ वाजता, झुम या ऑनलाईन मिटिंगच्या ॲपवरून घेण्याचा निर्णय झाला. या वार्षिक सर्वसाधरण सभेला भावे कुलातील जे भावे मित्र मंडळाचे सदस्य झालेले आहेत त्यांनी उपस्थित रहावे ही विनंती. या वार्षिक सर्व साधारण सभेला उपस्थित राहण्यासाठी सभेची लिंक खाली दिली आहे. घरात जेवढे सदस्य असतील त्या सर्वांनी स्वतंत्रपणे उपस्थित रहावे.**

**भावे मित्र मंडळाचे आर्थिक व्यवहार कुलबंधुंकडून येणाऱ्या देणग्यांवरच चालतात. त्यामुळे आपणास शक्य असेल तेवढी देणगी या निमित्ताने द्यावी ही विनंती. बँक अकाऊंटचे डिटेल्स पान क्र. ११ वर दिलेले आहेत.**

**१६ वी वार्षिक सर्व साधारण सभा खाली दिलेल्या विषयांचा विचार करून निर्णय घेण्यासाठी होणार आहे. गतवर्षी दिवंगत झालेल्या कुलबंधू आणि भगिनींना श्रध्दांजली अर्पण करून सभेस सुरूवात होईल. या सभेस आपण सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती.**

Ashish Bhave is inviting you to a scheduled Zoom meeting. Topic: Bhave Mitra Mandal Annual General meeting Time: March 25, 2023 07:00 PM India. Join Zoom Meeting
https://us02web.zoom.us/j/4029118857?pwd=cWlqQWRzaC9ZYy9aNC9HdW1US3FPZz09
Meeting ID: 402 911 8857
Passcode: MLFC4life

### सभेपुढील विषय

१) इ. स. २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल वाचन व अहवाल कार्यकारिणीच्या अध्यक्षांचे अनुमतीने स्वीकारणे. २) मंडळाच्या लेखापरीक्षकांकडून आलेल्या दि. ३१ मार्च, २०२२ चा ताळेबंद व आयव्यय पत्रकाचा विचार करून स्वीकृत करणे. ३) लेखापरीक्षक सी.ए.राजेंद्र भावे यांनी २०२२-२३ या कालावधीसाठी लेखापरीक्षणाचे काम करण्याची तयारी दर्शविली आहे. सर्वानुमतीने त्यांची नेमणूक करणे. ४) मंडळाची येणाऱ्या काळात वाढ होण्यासाठी काम करण्याची आवश्यकता या विषयी चर्चा. ५) माननीय अध्यक्षांच्या संमतीने आयत्या वेळचे विषय. ६) अध्यक्षांचे मार्गदर्शन.

पुणे.
दि. ८ फेब्रुवारी, २०२३

**अध्यक्ष**
**भावे मित्र मंडळ**

**सूचना** - १) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी संध्याकाळी ७.३० वाजता वरील ठिकाणी होईल. २) सभासदांनी आपल्या सूचना किंवा शंका लिखित स्वरूपात दि. १ मार्च, २०२३ पूर्वी मंडळाच्या कार्यालयात पाठवाव्यात. **३) सभेच्या वेळी भावे मित्र मंडळाचा ताळेबंद पाहण्यासाठी 'भावे-प्रयोग'चा हा अंक जवळ ठेवावा.**

### भावे शिक्षण निधी

सप्टेंबर २०२२ च्या अंकात भावे शिक्षण निधीकरिता अर्ज पाठविण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार आलेल्या अर्जांचा विचार भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीत झाला. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीची रक्कम भावे मित्र मंडळाच्या शिक्षण निधीने दिली आहे, त्यांची नावे खाली दिली आहेत.

**शिष्यवृत्ती -** प्रत्येकी रु. ८,०००/-

१) मृगज प्रशांत भावे, चंद्रपूर. Mech. Eng 4th sem 8.05 CGPA.

२) आदिती उदय भावे, वेतोशी. Ty. Bcom, CGPI 9.53. Appeared For C.A. IPCC and M.Com Part 1.

३) रसिका दत्तात्रेय भावे, पुणे. पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा इन लर्निंग डिसेबिलिटी.

४) मुक्ता श्रीकांत भावे, यवतमाळ. एल.एल.बी. दुसरे वर्ष.

५) श्रीनिवास श्रीकांत भावे, यवतमाळ. बी.कॉम. दुसरे वर्ष.

६) अथर्व हेमंत भावे, काटवली, चंद्रपूर. १२ वी सायन्स.

**भावे मित्र मंडळाचे लेखापरीक्षक सी.ए.राजेंद्र भावे यांनी त्यात भर घालून प्रत्येक विद्यार्थ्याला एक हजार रुपये दिले आहेत. भावे मित्र मंडळ त्यांचे आभारी आहे.**



चतुरंगच्या सर्वोत्तम विद्यार्थी गोडबोले पुरस्कारासाठी **आर्या अनिरुध्द भावे, पालशेत** हीची निवड झाली असून हा पुरस्कार तिला अभिनेता मनोज जोशी यांचे हस्ते दि. १५ जानेवारी २०२३ ला चिपळूण येथे दिला गेला.

चतुरंग अभ्यास वर्गाचे प्रेरणास्थान असलेल्या गुरुवर्य एस. वाय. गोडबोले गुरुजींच्या नावाने २१ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या चतुरंगच्या सर्वोत्तम विद्यार्थी गोडबोले पुरस्काराच्या निवडीसंदर्भातील मुलाखती चतुरंग कार्यालय, चिपळूण येथे घेण्यात आल्या. या वर्षी ५१ शाळातील १९७ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. या मुलाखतींमधून विविध २९ शाळातील २९ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

भगीरथ ग्रामविकास संस्थेचे संस्थापक डॉ. प्रसाद देवधर, एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडीयम स्कूल, डेरवणच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव आणि गोविंदराव निकम माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र वारे यांनी निवड समिती सदस्य म्हणून काम पाहिले.

(पान १ वरून)
अमेरिकेतील कॉलेजेस-युनिव्हर्सिटीजच्या प्रांगणात जॅकरांडा हमखास असतोच. नेमका त्यांच्या परीक्षांच्या हंगामात हा पठ्ठ्या वेड्यासारखा बहरून येतो आणि 'परीक्षा जवळ आल्या', 'असाईनमेंट्स कंप्लीट करायला घ्या' अशी विद्यार्थ्यांच्या मनात जणू धडकीच भरवतो! त्याच्या या भन्नाट 'टायमिंग'मुळे जॅकरांडाला 'पर्पल पॅनिक' आणि 'एक्झॅम ट्री' असेही म्हणतात! जॅकरांडाच्या झाडाखालून जाताना त्याचे फूल डोक्यावर पडले तर 'विद्यार्थी नक्की पास होईल' अशी गोड समजूत परदेशात प्रचलित आहे!

आपल्याकडे मात्र 'जॅकरांडा' या कवितेत कवी वसंत बापट म्हणतात तसा '.... इथे तिथे जिथे तिथे उघड उघड जॅकरांडा....' असा महाराष्ट्रापेक्षा भारताच्या उत्तरेस जास्त आढळतो. तेथील रस्त्यांच्या दुतर्फा, आलटून पालटून लावलेल्या, जॅकरांडा-बहाव्याच्या बहरलेल्या झाडांच्या कमानी खालून जाताना आपल्याला एकदम 'भारी' वाटते! कुठल्यातरी रियासतीचे आपण राजे महाराजे असून आपल्यावर छत्रचामरे ढाळत आहेत असा औटघटकेच्या 'राजेशाही थाटाचा' फील ही झाडे आपल्याला देतात (परदेशात निळा आणि जांभळा रंग 'रॉयल' मानले जातात, ही संगती इथे लक्षात घेणे इष्ट ठरेल!). झाडांच्या तळाशी विखुरलेला, निळा-जांभळा-पिवळा असा 'विरुद्ध' आणि म्हणूनच 'दिलखेचक' रंगसंगती साधणारा पाकळ्यांचा गालिचा आपले ते भावचित्र अजूनच देखणे करतो. नकळत 'ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा....' या काव्यपंक्ती गुणगुणाव्याशा वाटतात. स्वप्नातल्या गावाकडे नेणारी वाट अशी 'स्वप्नील' करणाऱ्या जॅकरांडाचे 'हृदयस्थ' असणे म्हणूनच आश्चर्यचकित करत नाही!

### 'आगळा' कैलासपती

वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन व्हावे म्हणून आपल्या पूर्वजांनी अनेक महत्त्वाच्या वृक्षांना धार्मिक अधिष्ठान दिले आहे. पण कुठलीही धार्मिक गोष्ट निगडीत नसूनही आणि मूळचा मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील असूनही, हिंदू आणि बौद्ध धर्मात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेला वृक्ष म्हणजे 'कैलासपती' होय. वैशिष्ट्यपूर्ण फुले आणि मोठ्या तोफगोळ्यासारख्या फळांमुळे निराळाच दिसणारा हा दुर्मिळ वृक्ष स्वार्थी मानवाकडून अवास्तव ओरबाडला जाऊ नये म्हणून अशी चतुर व्यवस्था करणाऱ्या आपल्या पूर्वजांचे आभार जितके मानावे तितके थोडे आहे!

शोभिवंत फुले येणारे हे झाड बरेच उंच वाढते. हिरवीकंच पाने फांदीच्या टोकाला गुच्छाने येतात. फुले तर थेट खोडालाच लागलेली असतात. याबाबतीत हे झाड इतरांपेक्षा खूपच वेगळे असल्याने अगदी उठून दिसते. भल्या पहाटे किंवा भर रात्री, एकाच वेळी अक्षरश: हजारो सुगंधी फुले बहरून आली असताना, दुरूनही ओळखू यावा असा धुंद परिमल जाणवतो. फुलात मधुरस नसला तरी भुंगे, मधमाशा याच्या सुवासामुळे आकर्षित होऊन कायम फुलांभोवती घोंघावत असतात. लाल-गुलाबी रंगाची झाक असलेल्या, टोकाला पिवळ्या असलेल्या सहा मेणचट पाकळ्यांनी फूल बनते. फुलातील पुंकेसराच्या समुदायाचा आकार आडव्या इंग्रजी 'U' अक्षरासारखा वाटतो. फुलाच्या अगदी मध्यभागी शिवलिंगाच्या आकारासारखा फलनक्षम पुंकेसरांचा गुच्छ असतो आणि अफलनक्षम पुंकेसरांचा नागाच्या फण्यासारखा गुच्छ मधल्या शिवलिंगाच्या गुच्छावर झुकलेला असतो. आपल्या अळ्यांना भरविण्यासाठी अफलनक्षम पुंकेसर गोळा करत असताना भुंग्यांच्या अंगावर फलनक्षम पुंकेसरातील परागकण पडतात. दुसऱ्या फुलावर जाऊन बसल्यावर त्यांच्या अंगावरचे हे फलनक्षम परागकण या दुसऱ्या फुलातील स्त्रीकेसरावर पडून परागीभवनाची प्रक्रिया पूर्ण होते.

फुले महादेवाला अर्पण केली जात असल्याने महादेवाच्या देवालयांच्या आसपास आणि स्त्रीकेसराच्या गोलाकाराचे बुद्ध स्तूपाशी साम्य असल्यामुळे बुद्ध विहारांनजीक या झाडाची लागवड केली जाते. वर वर्णिलेल्या दोन प्रकारच्या पुंकेसरांच्या विशिष्ट रचनेमुळे या झाडाला 'नागचाफा'ही म्हणतात. नागलिंग, तोपगोला (हिंदी), नागलिंग फूल (बंगाली), नागलिंग पुष्प (कानडी), नागलिंगम (तमिळ), नागमल्ली (तेलुगू), नागदंती (मल्याळम), नागकेसर (ओरिया) अशी इतर भाषांत याची नावे आहेत. 'कैलासपती' असे धीरगंभीर नाव धारण करणाऱ्या या वृक्षाला वनस्पतीशास्त्रातही *Couroupita guianensis* असे क्लिष्ट नाव मिळाले आहे. अर्थात महादेवाशी निगडीत असलेल्या वृक्षाला नावच काय, नाजुकसाजूक असे काहीच शोभून दिसणार नाही म्हणा!

या झाडावर एकाच वेळी १५० फळे लगडलेली असू शकतात. फळे



तपकिरी, जड, गोलाकार असून त्यांच्या दणकट, लाकडी कवचामुळे आणि खाली पडताना होणाऱ्या जबरदस्त आवाजामुळे या झाडाला इंग्रजीत 'कॅननबॉल (तोफगोळा) ट्री' असेही म्हणतात (कपाळमोक्ष टाळण्यासाठी या झाडाजवळून जपून जाणे जास्त श्रेयस्कर!). फळ परिपक्व व्हायला एक ते दीड वर्षांचा कालावधी लागतो. फळ खाली पडल्यावर फुटून किंवा डुक्कर, कोंबडी या प्राण्यांकडून फोडले जाऊन, आतील दुर्गंधयुक्त गर आणि बिया (साधारणत: ५००) बाहेर पडतात. जितकी सुगंधी फुले तितकीच अतिदुर्गंधी फळे असे निराळेच वैशिष्ट्य असणारे हे झाड त्वचारोग, हिवताप, सर्दी-खोकला, कृमी, पोटदुखी, दातदुखी, जखमा अशा विविध विकारांवरही उपयुक्त आहे.

जगभर ख्याती असलेला, आपल्या 'पुडूचेरी' या केंद्रशासित प्रदेशाचे 'राज्यफूल' असलेला, फांद्यांच्या विस्तीर्ण जटांचा गुंताडा आणि हिरवीगार पाने-लाल गुलाबी फुले-तपकिरी फळे असे रंगीबेरंगी 'अलंकार' अंगावर मिरवणारा हा आगळावेगळा वृक्ष एकाच वेळी तपस्वीही भासतो आणि समाधानी-कुटुंबवत्सल गृहस्थासारखाही वाटतो. नकळत त्याच्या या अनोख्या रूपापुढे आपण भक्तिभावाने नतमस्तक होतो!

**संदर्भ –**


१) अचूकतेसाठी तांत्रिक माहिती आंतरजालावरून घेतली आहे.

२) जमदाडे, ज. वि. (२०१८) – मराठी विश्वकोश (खंड ५), गुलमोहर, निळा.

3) William Boericke (1927) – Jacaranda (Brazilian Caroba tree), Pocket Manual of Homoeopathic Materia Medica & Repertory, B. Jain Publishers Pvt. Ltd. New Delhi - 110055, Reprint edition: 1993.


४) क्रमांक ३ चा संदर्भ उपलब्ध करुन दिल्याबद्दल डॉ. श्रीकांत गोडबोले, मुंबई यांचे मन:पूर्वक आभार!

⌘⌘⌘

**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व) मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!
**© शशिकिशोर दत्तात्रय भावे, पुणे.**

**१) गुहागर घराण्याच्या पालशेत शाखेतील आदर्श समाजसेवी कर्मयोगी कै. दत्तात्रेय प्रभाकर भावे.**

दत्तात्रेय प्रभाकर भावे हे सोलापूर येथे रुग्णोपयोगी वस्तुसंग्रहालय चालविणारे म्हणून भारतभर गाजले गेले. त्यांचा जन्म ०५-०२-१८९९ या दिवशी झाला. व्यवसायाने ते शिक्षक होते. पण त्यांनी समाजसेवेचे व्रत घेतले होते. १९३२ मध्ये त्यांनी रुग्णोपयोगी वस्तू सहाय्य केंद्र सुरू केले व ते अखेरच्या क्षणापर्यंत चालविले. त्यांचे चिरंजीव रमेश यांनी त्यांचा हा वारसा पुढे चालवून पुणे येथे हे केंद्र चालविले. अगदी अलीकडेच रमेशरावांचे निधन झाले.

दत्तात्रेय भावे यांचा जन्म एका गरीब व संस्थानातल्या कर्मचाऱ्याच्या घरी कोकणातल्या आडगावी झाला. वडिलांच्या वारंवार बदल्या होत असत व त्यामुळे त्यांच्या शाळाही वारंवार बदलत गेल्या. व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा पास झाल्यावर त्यांनी ट्रेनिंग कॉलेजात प्रवेश घेतला व शिक्षक होण्याचे ठरविले.

त्यांच्या शेजारच्या राजवाड्यांकडे थोरामोठ्यांचे येणे-जाणे असे. आपण समाजासाठी काहीतरी करावे ही उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नसे. एकदा त्यांचे बंधू तापाने आजारी झाले. ताप उतरविण्यासाठी बर्फाची पिशवी आवश्यक होती. घरात पिशवी नव्हती म्हणून ते एका श्रीमंत मित्राकडे गेले. तिथे त्यांचे घरी त्यांनी पिशवी, थर्मामीटर, बेडपॅन इ. वस्तू निरूपयोगी अवस्थेत पाहिल्या. त्यांचे मनात विचार आला की अशा वस्तू एखादे ठिकाणी पडून रहातात, तर त्या वस्तू एखाद्या गरजूंना देता आल्यास वेळप्रसंगी त्यांना त्या उपयोगी पडू शकतात. त्यांनी या वस्तू अन्यत्र उपयोगी पडल्यास मिळतील का अशा विचारणा केली. त्या सद्‌गृहस्थांनीही आनंदाने त्या वस्तू त्यांचे स्वाधीन केल्या. या सेवेत त्यांना गरजू लोकांना अल्पदरात किंवा वेळप्रसंगी विनामोबदलाही त्या वस्तू देता आल्याने जे समाधान मिळत असे ते वेगळेच होते. कालांतराने लोक आपल्याकडील अशा वस्तू त्यांना आणून देऊ लागले व हळूहळू भावे यांचेकडे रुग्णोपयोगी वस्तुंचे एक केंद्रच तयार झाले. त्याचे नाव भावे रुग्णोपयोगी वस्तूसंग्रह, सोलापूर असे होते. यातूनच त्यांनी पुढे लोकहितासाठी 'आरोग्य व्याख्यानमाला' चालू केली. अनेक वर्षे त्यांनी योगासनांचे वर्गही चालविले. त्यांच्या काही माजी विद्यार्थींनी आता डॉक्टर झाल्या होत्या. त्यांच्या मदतीने त्यांनी बालक व महिला यांचेसाठी मोफत तपासणी केंद्र काढले. एका सहृदय सिव्हिल सर्जननी त्यांना काही ऑक्सिजन सिलेंडर्सही दिले. पुढे खूप खटपट करून UNICEF, केंद्र सरकार व टाटा चॅरिटिज यांचेशी पत्रव्यवहार करून संपर्क साधून व खटपट करून रुग्णवाहिकाही मिळविल्या. यामुळे त्यांच्या या कार्याचा बोलबाला होऊ लागला. त्यांच्या या कार्याची लेडी लम्ले, पं. हृदयनाथ कुंझरु, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकनायक अणे अशा थोर व्यक्तींनी प्रशंसा केली होती. स्वातंत्र्य चळवळीत देशभक्तांना गुप्तपणे सर्व तऱ्हेची मदत त्यांनी केली होती.

श्रीमती तारा चेरियनसारख्या तळमळीच्या समाजसेविकेकडून रेफ्रिजरेटर मिळविला आणि पोलिओ ट्रिपलवरच्या इलाजाचे केंद्र सुरू केले. त्याकाळात अशा प्रकारचा इलाज होणारी ठिकाणे फारशी नसत अशा काळात एका वेळी ३०० ते ४०० मुले त्यांच्या केंद्रात उपचारासाठी येत असत. यासाठी आपल्या डॉक्टर बंधूंनाच त्यांनी गळ घातली आणि पुढे संस्थेचा दवाखानाही चालू केला. त्यांची सेवानिवृत्ती कधी आली आणि कधी गेली ते त्यांना कळलेही नाही इतके त्यांनी या कामात स्वत:ला झोकून दिले होते. आपली सर्व कार्यशक्ती त्यांनी सदैव या कार्यासाठी वेचलेली होती. संस्थेला देणगी मिळविण्यासाठी ते निरनिराळ्या युक्त्या शोधीत आणि देणग्या मिळवीत.

त्यांच्या पंच्याहत्तरी निमित्त लोकांनी त्यांचा सत्कार करून त्यांना थैली अर्पण केली. आमदार, नामदारांच्या उपस्थितीत मोठा देखणा समारंभ पार पडला. ही थैलीतील रक्कम त्यांनी बँकेत ठेवली आणि तिच्या व्याजातून येणाऱ्या पैशातून गरजू रुग्णांना मदत केली. या निमित्ताने अनेक थोरामोठ्यांशी त्यांच्या गाठीभेटी होत. सहा माजी राष्ट्रपती, तीन पंतप्रधान त्यांना भेटलेले आहेत. ते शिक्षक असल्याचे कळताच राष्ट्रपती डॉ. जाकिर हुसेन यांनी त्यांना कडकडून मिठी मारली. श्रीमती इंदिरा गांधीनी तर स्वत: हाताला धरून त्यांना मंडपातून बंगल्यात नेले आणि त्यांचे गाऱ्हाणे ऐकले. मिनिटभरही वेळ नसताना संस्थेत भेटीसाठी आलेले डॉ. राधाकृष्णन पुढच्या कार्यक्रमासाठी तासभर उशीरा गेले. क्रिकेटपटु विजय मर्चंट तर त्यांना म्हणत, 'संस्थेत आल्यावर हक्काने माझी गाडी वापरीत जा.' अशा तऱ्हेने त्यांच्या या कामाचे जे चीज झाले त्याची किंमत रुपया-आण्यात होऊ शकणार नाही.

रुग्णोपयोगी साहित्य देण्याच्या एका सेवा प्रकारातून व छोट्याशा सुरवातीतून ते बहुविध रुग्णसेवा पुरविणाऱ्या एका मोठ्या संस्थेत रूपांतर झाले याला कारण भावे यांची उद्योगवृत्ती, सेवाभाव व चिकाटीने, तळमळीने कार्य करण्याची त्यांची सवय. अगदी साध्या गोष्टीतून मोठे कार्य त्यांचे हातून पार पडले. गरजूंना रुग्णोपयोगी साहित्य देणे, आपण ऐकलेल्या चार गोष्टी इतरांना सांगणे, व्याख्याने भरवून तज्ज्ञ लोकांचे विचार सर्वसामान्यांना ऐकवणे यासाठी लोकसंग्रह हवा. जवळजवळ बिनभांडवली अशी ही संस्था त्यांनी १९३२ मध्ये सुरू केली. या संस्थेचा विस्तार होऊन १९५० मध्ये संस्थेची स्वत:ची इमारत उभी राहिली, तर १९७९ मध्ये महापालिकेकडून जमीन खरेदी करून संस्थापक श्री. दत्तात्रेय प्रभाकर भावे यांच्या ८६ व्या वाढदिवशी दि ०५-०२-१९८४ ला संस्थेच्या नवीन १५०० स्क्वेअर फुटांच्या इमारतीचे उद्‌घाटन झाले. आज संस्थेजवळ विविध प्रकारची ४०-४५ उपकरणे आहेत. यात रुग्णवाहिका, सिलेंडर्स याही गोष्टी आहेत. त्यांनी आपल्या मुलाच्या सहकार्याने पुण्यातही शाखा काढली होती.

⌘⌘⌘

**संपर्क :** प्लॉट नं ९, सरगम, नवकेतन सोसायटी,
कोथरुड, पुणे ४११०३८ **भ्रमणध्वनी :** ७५५९४४४५२१

**आवाहन**

सर्व भावे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना विनंती की, त्यांनी आपल्या कुटुंबियांपैकी कोणाचेही विशेष प्राविण्य, सत्कार, गौरव, वाढदिवस अथवा महत्त्वाच्या पदावर नियुक्ती इत्यादी प्रकारची कोणतीही महत्त्वाची घटना त्या प्रसंगाच्या फोटोसह bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावी, किंवा अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या भ्रमणध्वनीवर Whats App वर पाठवावी म्हणजे त्याचे वृत्त पुढील अंकात समाविष्ट करता येईल. अशा वृत्तांमुळे आपल्या आनंदात सर्वच भावे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना सहभागी होता येईल.

'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक सर्व भाव्यांना व माहेरवाशिणींना कोणतीही वर्गणी न घेता पाठवला जातो. अंक पाठविण्याचा संमेलनाची वर्गणी, आजीव सदस्यत्त्व किंवा स्वनिधीला दिलेली रक्कम याचेशी कोणताही संबंध नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. म्हणजेच आपण सदस्यत्त्व, स्वनिधीची रक्कम द्यावीच, पण 'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक आला नाही तरी जरूर कळवावे. अंक शिल्लक असल्यास नक्की पाठविला जाईल. आपला बदललेला पत्ता, फोन नंबर व मेल अ‍ॅड्रेस खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावा किंवा फोनवर कळवावा, म्हणजे सर्व मेलिंग लिस्टमधे तो अद्ययावत होईल. 'भावे-प्रयोग'या भावे मित्र मंडळाच्या प्राजक्तच्या अंकासाठी साहित्यही या पत्त्यावर पाठवावे. **भावे मित्र मंडळ, १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

# सहवेदना

**भिलवडी घराण्यातील रंगभूषाकार व मुखवटाकार प्रभाकर नीळकंठ भावे** यांचे दि. १० जानेवारी २०२३ या दिवशी वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सुहासिनी, दोन कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

पुण्यामध्ये असलेली महाराष्ट्रीय कलोपासक ही संस्था नाट्यकर्मींची जणू पंढरी म्हणून ओळखली जाते. ही संस्था महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळावा म्हणून गेली कित्येक वर्षे पुरुषोत्तम करंडक ही स्पर्धा भरविते. या एकांकिका स्पर्धेत भाग घेता यावा यासाठी महाराष्ट्रभरातले महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी धडपडत असतात. अशा स्पर्धेचे विजेतेपद मिळाले तर त्या महाविद्यालयाला आणि त्यात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना जणू ऑस्कर मिळाल्याचा आनंद होतो, प्रसिध्दी मिळते. एवढा मोठा दबदबा या स्पर्धेचा आहे. अशा स्पर्धेच्या अंतीम फेऱ्यांमधून सुमारे २५-३० वर्षे नेपथ्य काम प्रभाकर नीळकंठ भावे करीत असत. महाराष्ट्रात ते 'मुखवटाकार भावे' म्हणून परिचित होते. गेल्या ३०-४० वर्षात नेपथ्य, मुखवटे रचना इ. क्षेत्रात त्यांचे स्थान फार वरचे होते.



१९५०-५१ चे सुमारास प्रभाकररावांचे कुटुंबावर एक मोठेच संकट ओढवले होते. प्रभाकररावांचे वडील तेव्हा साताऱ्यास होते. प्रभाकररावांचा जन्म १५ एप्रिल १९४६ रोजी साताऱ्याला झाला. पण त्यानंतर काही वर्षांनी भावे कुटुंबियांना मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागले. सातारा येथे जलमंदिर आहे व ते छत्रपतींचे ऐतिहासिक देवस्थान आहे. या मंदिरात १९५० चे सुमारास मोठी चोरी होऊन बराच ऐवज चोरीला गेला व त्याचा आळ नीळकंठराव भावे व दुसरे एक कुटुंब आपटे यांचेवर येऊन या दोन्ही कुटुंबीयांवर खटला भरला आणि चोरीचा ठपका ठेवण्यात आला. ही चोरी करणारे प्रत्यक्षात दुसरेच चोर होते आणि पुढे ते सिध्दही झाले. आकसाने अटक केलेल्या भावे व आपटे यांचे तुरुंगात अतोनात हाल झाले, प्रसंगी मारहाणही झाली. खटला २/३ वर्षे चालला व काहीच दोष नसल्यामुळे भावे आणि आपटे यांना निर्दोष मुक्त करण्यात आले. अशा या पडत्याकाळात प्रभाकररावांचे बालपण गेले. त्यांचे आजोबा एका नाटकात स्त्री व्यक्तिरेखा साकारत असत. त्यामुळे विद्यार्थीदशेपासूनच त्यांचा नाट्यकलेकडे ओढा होता. मुखवटाकार व रंगभूषाकार म्हणून प्रसिध्द असलेल्या प्रभाकररावांनी रंगभूषेचे प्राथमिक शिक्षण प्रथम आपले वडील नीळकंठ श्रीपाद भावे यांचेकडून व नंतर कै. दादा परांजपे आणि कै. नाना जोगळेकर यांचेकडून घेतले. मॅट्रिक व मेकॅनिकल ड्राफ्टसमनचे शिक्षण पुरे होताच १९६८ मध्ये पुण्याच्या किर्लोस्कर कमिन्स कंपनीत नोकरीस लागले.

रंगभूषा व वेशभूषा या रंगभूमीवरील महत्त्वाच्या गोष्टी. त्या दृष्टीने भूमिकेचा अभ्यास करून त्या त्या पात्राचा मेकअप करणे व तो मेकअप भूमिकेला न्याय देणारा ठरणे यातच मेकअप व मुखवटाकाराचे यश अवलंबून असते. प्रभाकररावांचे या क्षेत्रातील यश हे वादातीत होते. या क्षेत्रातील त्यांचा अनुभव जवळजवळ ४०-५० वर्षांचा. विशेष म्हणजे या संबंधात लागणारी उपकरणे, केसांचे टोप, मुखवटे ते स्वत:च बनवित असत. ते उत्तम चित्रकार होते. कोलाजच्या माध्यमातून मासिकातील निरनिराळे फोटो वापरून गणपती, भारतीय सण अशा वेगवेगळ्या विषयांवरील कोलाज पेंटिंग्ज त्यांनी केली होती.

संस्कार भारतीच्या '२२ जून १८९७ एक चैतन्य स्मरण' या महानाट्यातील ७० कलाकारांचा मेकअप त्यांनी विनामोबदला केला होता. तसेच त्यांनी शनिवारवाड्यावर झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील महानाट्यातील १०० कलाकारांचाही मेकअप केला होता. २००६ साली झालेल्या रा.स्व.संघाचे पूर्व सरसंघचालक प.पू.श्री गुरुजी यांचे जीवनावरील महानाट्याच्या १२५ कलाकारांचा मेकअपही त्यांनी केला होता.

ते आपल्या वडिलांनी एस. रोझ या कंपनीचा घेतलेला ऑर्गन वाजवीत असत. पुढे ऑर्गन वाजविणे थांबविल्याने त्यांनी तो २८ नोव्हेंबर २०१६ ला समारंभपूर्वक गांधर्व महाविद्यालयाकडे सुपूर्द केला.

नाट्यविषयक हौशी संस्था आणि राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा अशा संस्थांना ते नेहमीच सहकार्य करीत. १९६८ पासून किर्लोस्कर कमिन्स, पुणे येथे नोकरी करीत असताना फावल्या वेळात मुखवटे आणि रंगभूषा या विषयाचा सखोल अभ्यास त्यांनी केला. या संबंधातील इंग्रजी वाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास केला. पुण्यातील नावाजलेल्या महाराष्ट्रीय कलोपासक व अन्य संस्थांनाही व पुण्याबाहेरील इतर संस्थांना त्यांनी सहाय्य केले होते.

टेली-फिल्म्स, चित्रपट, बाल चित्रपट यासाठी रंगभूषेची कामेही त्यांनी केली. एक होता विदूषक हा चित्रपट तसेच 'वाडा चिरेबंदी', हमीदाबाईची कोठी, नाट्यरंग संस्थेचे 'सोनेरी मासा' जय जय गौरीशंकर, स्वयंवर, सौभद्र सारख्या अनेक संगीत नाटकातील पात्रांचा साज रंगवीत असत.

आत्तापर्यंत भारतीय तसेच पाश्चात्य परंपरेचे सुमारे १७५ मुखवटे त्यांनी तयार केले. नवनवीन प्रकारचे मुखवटे करण्याचे काम ते सतत करीत होते. या वेगवेगळ्या मुखवट्यांची प्रदर्शनेही त्यांनी पुणे, सातारा, सांगली, इंदूर(नाट्यसंमेलनाचे वेळी), भोपाळ इ. ठिकाणी भरविली होती. थिएटर ॲकॅडमीने त्यांना अनुदान दिले होते व निरनिराळ्या ठिकाणी जाऊन त्यांनी या विषयाचा अभ्यास केला होता. नाट्यस्पर्धेच्या निमित्ताने त्यांनी १९८२ मध्ये कॅनडा व १९८९ मध्ये युरोपचा प्रवास केला. त्यांनी या विषयासाठी अमेरिकेचाही प्रवास केला. 'रंगभूषा' या नावाचे रंगभूषेमागील विचार मांडणारे पुस्तकही त्यांनी प्रकाशित केले होते. त्याचा प्रकाशन समारंभ साहित्यिक पु.ल.देशपांडे यांचे हस्ते पार पडला होता. या पुस्तकाच्या गुणवत्तेबद्दल पु.लं.नी प्रशंसोद्गार काढले होते. 'रंगभूषा'या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्तम साहित्यकृतीचा पुरस्कार मिळाला आहे.

अखिल भारतीय मराठी परिषदेचे ते दोन वर्षे संयुक्त चिटणीस होते व त्या संस्थेच्या कार्यकारी मंडळावरही त्यांनी काम केले.

भावे मित्र मंडळाशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. मुखवटे या विषयाचे प्रात्यक्षिकासह व्याख्यान त्यांनी भावे मित्र मंडळाच्या एका कार्यक्रमात दिले होते.

त्यांना महाराष्ट्र शासनाचा २०१६ चा कलाक्षेत्रातील राज्य सांस्कृतिक पुरस्कार, शनिवार, दि. ४ मार्च, १०१७ ला रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई, येथे प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रु. एक लाख असे होते. **२०१२ साली अलिबाग येथे झालेल्या भावे मित्र मंडळाच्या संमेलनात त्यांना कुलभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते.**

**एका वेगळ्याच विषयात आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटविणाऱ्या प्रभाकररावांचा भावे मंडळींना नेहमीच अभिमान वाटत राहील.**

**शद्बांकन – शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पुणे भ्रमणध्वनी :** ७५५९४४४५२१

त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

## भाव्यांचे कुलदैवत कोळेश्वराच्या व कुलस्वामिनी अंबेजोगाईतील योगेश्वरीच्या दर्शनासाठी कसे जायचे, राहण्याची सोय काय आहे? याची विचारणा होत असते, त्या करिता कोळथरेला व अंबेजोगाईला जाण्याची माहिती व निवास व्यवस्था.

### अंबेजोगाईला जाण्याची माहिती रस्त्याने व रेल्वेने

१) **पुण्याहून** – अहमदनगर–अंमळनेर(जि.बीड)–बीड–तेलगाव–धारूर–आडस–अंबेजोगाई, अंदाजे ३४० कि.मी., अंदाजे ८ तास प्रवास. **दुसरा मार्ग** – इंदापूर–टेंभुर्णी–कुर्डूवाडी–बार्शी–येरमाळा–कळंब–केज–अंबेजोगाई, अंदाजे ३५० कि.मी., अंदाजे ८ तास प्रवास.

२) **नाशिकहून** – संगमनेर–चाकण–अहमदनगर–अंमळनेर(जि. बीड)–बीड–तेलगाव–धारूर–आडस–अंबेजोगाई अंदाजे ४२५ कि.मी. अंदाजे ९ तास प्रवास.

३) **मुंबईहून** – लोणावळा–तळेगाव–चाकण–शिक्रापूर–अहमदनगर–अंमळनेर(जि.बीड)–बीड–तेलगाव–धारूर–आडस–अंबेजोगाई, अंदाजे ४९० कि.मी., अंदाजे १० तास प्रवास.

४) **गोवा/कोल्हापूर/सांगली/मिरज** – कराड–पंढरपूर–बार्शी–येरमाळा–कळंब–केज–अंबेजोगाई.(या चारही ठिकाणांहून जायचा एकच मार्ग दिल्याने अंतरे व अंदाजे लागणारा वेळ दिलेला नाही.)

अंबेजोगाईला जाण्यासाठी आपणास मुंबई, पनवेल, पुण्याहून जाणे देखील सोपे आहे. पनवेल–नांदेड गाडी क्रमांक १७६१३ अशी रेल्वे आहे. त्या गाडीने गेल्यास सकाळी लवकर परळी वैजनाथला उतरावे. परळी वैजनाथला रेल्वेची रिटायरिंग रूमची सोय आहे. ती आरक्षित करून प्रातर्विधी उरकून सामान तेथेच ठेऊन एसटी बसने किंवा टॅक्सीने अंबेजोगाईला जाता येते. जायला साधारण अर्धा–पाऊण तास लागतो. परळीचा एसटी स्टँड रेल्वे स्टेशनच्या अगदी जवळ आहे. अंबेजोगाईला दर्शन घेऊन परत परळीला येता येते. खूप वेळ असल्याने वैजनाथाचेही दर्शन घेता येते. नांदेड–पनवेल गाडी क्रमांक १७६१४ ही रेल्वे संध्याकाळी परळीला येते, तिने दुसरे दिवशी सकाळपर्यंत परत येता येते. हे खूपच सोयीस्कर आहे.

### अंबेजोगाईतील निवास व्यवस्था

श्री. अंबेजोगाई भक्तनिवास न्यास, पुणे व चित्तपावन ब्राह्मण संघ, गिरगांव मुंबई, यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीयोगेश्वरी देवीच्या देवळाजवळ दोन मिनिटांचे अंतरावर, मुकुंदराज रस्त्यावर, तीन मजली भक्तनिवास बांधले आहे. भरपूर हवा, उजेड, वातानुकूलित खोल्या, डॉर्मेटरीज, अॅटॅच्ड बाथरूमसह खोल्या, आच्छादित पार्किंग अशा सोयींनी युक्त असे हे भक्तनिवास आहे. आधी कळविल्यास चहा, नाष्टा, भोजनाची सोयही तेथे होईल. संपर्काचे पत्ते व फोन नंबर खाली दिले आहेत.

**रूम नोंदणीसाठी** – श्री. अंबेजोगाई भक्तनिवास न्यास, मुकुंदराज समाधी रस्ता, मु. पो. अंबेजोगाई, जि. बीड, पिन – ४३१५१७ मोबाईल : ७८८८०३६३०८, फोन : (०२४४६) २४९३०८

**भक्तनिवासातील भोजनाकरिता** गौरी जोशी यांना फोन करावा. त्यांचा मोबाइल नं ८८०५०९८५५० हा आहे.

### कोळथरेला जाण्याची माहिती.

१) **पुण्याहून** – ताम्हिणी घाटामार्गे–माणगाव–महाड–लाटवण–दापोली–कोळथरे, अंदाजे २३५ कि.मी., अंदाजे ५ तास प्रवास. **दुसरा मार्ग** – कात्रज घाटामार्गे–भोर–वरंधा घाट–महाड–लाटवण–दापोली–कोळथरे, अंदाजे २२० कि.मी., अंदाजे ५ तास प्रवास.

२) **नाशिकहून** – संगमनेर–चाकण–कासारवाडी–हिंजवडी–चांदणी चौक (पुणे) – ताम्हिणी घाटामार्गे–माणगाव–महाड–लाटवण–दापोली–कोळथरे, अंदाजे ४१५ कि.मी. अंदाजे ९ तास प्रवास. **दुसरा मार्ग** – इगतपुरी–शहापूर–कल्याण–ठाणे–पनवेल–पेण–माणगाव–महाड–लाटवण–दापोली–कोळथरे, अंदाजे ३८० कि.मी., अंदाजे ८ तास प्रवास.

३) **मुंबईहून** – पनवेल–पेण–माणगाव–महाड–लाटवण–दापोली–कोळथरे, अंदाजे २५० कि.मी., अंदाजे ५ तास प्रवास.

४) **गोव्याहून** – कुडाळ–कणकवली–रत्नागिरी–गणपतीपुळे–गुहागर–जेट्टीने (फेरी बोट) दाभोळ–कोळथरे, अंदाजे ३६० कि.मी., अंदाजे ८ तास प्रवास.

५) **सोलापूरहून** – पंढरपूर–कराड–चिपळूण–गुहागर–जेट्टीने (फेरी बोट) दाभोळ–कोळथरे, अंदाजे ३८० कि.मी., अंदाजे ८ तास प्रवास.

६) **कोल्हापूर/सांगली/मिरज या ठिकाणांहून** – कराड–चिपळूण–गुहागर–जेट्टीने (फेरी बोट) दाभोळ–कोळथरे, अंदाजे २४० कि.मी., अंदाजे ५ तास प्रवास.

### कोळथरेतील निवास व्यवस्था

श्रीदेव कोळेश्वराचे शरदचंद्र सोमण हे मुख्य पुरोहित आहेत. त्यांचा मोबाईल ७६६६३४१५९३ हा आहे. आनंद अशोक भावे यांचे गारवा बीच रिसॉर्ट येथे निवास व भोजनाची व्यवस्था होते. त्यांचे फोन नंबर्स ९७६४०६५८१० / ८०८०७१०६७७ / ८६६९७३६००८ / ९४०५२४९४२५ हे आहेत. श्रीदेव कोळेश्वर देवस्थानच्या भक्तनिवासाचे व्यवस्थापन जयंत दातार बघतात. जयंत दातारांकडेही निवास व भोजनाची तसेच अभिषेक व पूजेची व्यवस्था होते. त्यांचे मोबाईल नंबर ७३५०४२१८९४ / ७०२१७८१२१५/ ९४२१३७९०५४.

**ताम्हीणी घाटाचा रस्ता व महाड मार्गे दापोली व वरंधा घाटाचा रस्ता हे रस्ते आता चांगले झाले आहेत. आंबेत मार्गे जाऊ नये.**

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950.
SCHEDULE IX [VIDE RULE 17 (1)]

NAME OF THE TRUST: BHAVE MITRA MANDAL (TRUST) REGISTRATION NO. : MAH /357/2006

BALANCE SHEET AS ON 31.03.2022

| LIABILITIES | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) | ASSETS | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus | | | Immovable Properties : | | |
| | | | Investments: | | |
| Corpus Fund | 506,988.00 | | Fixed deposits | | 95,741.00 |
| Reserves & Surplus | 1,833,970.00 | 2,340,958.00 | F.D. Bhave Shikshan Nidhi | | 1,250,000.00 |
| | | | F.D.With I.D.B.I | | 1,318,986.00 |
| Other Earmarked Funds | | | Software | | 2,000.00 |
| Any other funds | | NIL | | | |
| Building Fund | | NIL | Website | | 8,500.00 |
| | | | Loans | | NIL |
| Loans | | NIL | | | |
| (Secured or Unsecured) | | | Advances | | NIL |
| Advance from Trustees | | NIL | Cash & Bank Balance : | | |
| | | | Cash in hand | | 30,153.00 |
| Liabilities | | | Cash at bank | | 331,178.00 |
| For Expenses | | 8,360.00 | Accrued Int on F.D. | | 22,989.00 |
| Income & expenditure A/c | | | T.D.S. | | 33,673.00 |
| opening balance | 693,708.00 | | | | |
| Add : Prior period adjustment | NIL | | | | |
| Add: Surplus | 50,194.00 | 743,902.00 | | | |
| (as per Income & Expenditure A/c) | | | | | |
| TOTAL (Rs.) | | 3,093,220.00 | TOTAL (Rs.) | | 3,093,220.00 |

The figures are extracted on the Basis of Information & Explanation given by the Trustees.

The above Balance Sheet is true and correct
as per my knowledge & belief

As Per our Report of Even Date
FOR **Bhave & Bhave Associates.**
Chartered Accountants
UDIN : 22044254AREXMG9654
FRN : 118631W

CHAIRMEN TRUSTEE TRUSTEE

CA.R.S.Bhave
PARTNER

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950.
SCHEDULE IX [VIDE RULE 17 (1)]

NAME OF THE TRUST: BHAVE MITRA MANDAL (TRUST) REGISTRATION NO. : MAH /357/2006

INCOME AND EXPENDITURE ACCOUNT
FOR THE YEAR ENDED ON 31.03.2022

| EXPENDITURE | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) | INCOME | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| To Expenditure in respect of Properties: | | | By Rent | | NIL |
| a) Rates, Taxes & cesses | | NIL | By Interest | | 158,904.00 |
| b) Repairs & Maintainance | | NIL | | | |
| c) Salaries | | NIL | By Dividend | | NIL |
| d) Insurance | | NIL | | | |
| e) Depreciation | | NIL | By Donation | | 174,501.00 |
| f) Other Expenses | | NIL | | | |
| | | | By Nisarg Donation | | 0.00 |
| To Establishment Expenses (as per schedule - A ) | | 3,935.00 | By Prajakt Donation | | 9,500.00 |
| To Miscellaneous Expenses | | NIL | By Gathering Subscription & Donation | | NIL |
| | | | By Kulvrutant Subscription | | 201.00 |
| To Depreciation | | 3,690.00 | | | NIL |
| | | | By Bhave Swanidhi | | NIL |
| To Amount Tr. To Reserve or Specific Funds | | NIL | By Income from Other Sources | | 0.00 |
| To Expenditure on Object of Trust (as per schedule - B) | | 284,107.00 | | | |
| To Audit Fees | | 1,180.00 | | | |
| To Surplus carried over to Balance - Sheet | | 50,194.00 | By Deficit carried over to Balance - Sheet | | NIL |
| TOTAL (Rs.) | | 343,106.00 | TOTAL (Rs.) | | 343,106.00 |

The figures are extracted on the Basis of Information & Explanation given by the Trustees.

The above Balance Sheet is true and correct
as per my knowledge & belief

As Per our Report of Even Date
FOR **Bhave & Bhave Associates.**
Chartered Accountants
UDIN : 22044254AREXMG9654
FRN : 118631W

CHAIRMEN TRUSTEE TRUSTEE CA.R.S.Bhave PARTNER

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950.
SCHEDULE IX [VIDE RULE 17 (1)]

NAME OF THE TRUST: BHAVE MITRA MANDAL (TRUST)
REGISTRATION NO. : MAH /357/2006

SCHEDULE --- A : ESTABLISHMENT EXPENSES FOR 31.03.2022

| | |
|---|---|
| 01. Accounting Charges | 3,000.00 |
| 02.Printing & Stationery | 820.00 |
| 03. Bank Charges | 115.00 |
| TOTAL | 3,935.00 |

SCHEDULE --- B : OBJECT OF THE TRUST

| | |
|---|---|
| 01. Magazine Expenses | 84,630.00 |
| 02. Scholarships & Educational Aid | 50,000.00 |
| 03.Postage & Courier | 330.00 |
| 04.Aids toChiplun Disasters | 149,147.00 |
| TOTAL | 284,107.00 |

Reserves & Surplus :

| | Opening Bal As on 01.04.21 | Addition During Year | Closing Bal As on 31.03.22 |
|---|---|---|---|
| 01. Bhave Shikshan Nidhi | 1,165,411.00 | 175,500.00 | 1,340,911.00 |
| 02. Swanidhi | 474,059.00 | 19,000.00 | 493,059.00 |
| 03. Corpus Fund | 504,988.00 | 2,000.00 | 506,988.00 |
| | 2,144,458.00 | 196,500.00 | 2,340,958.00 |

As Per our Report of Even Date

CHAIRMEN TRUSTEE TRUSTEE CA.R.S.Bhave PARTNER

**Auditors Remark :- On the Report of Bhave Mitra Mandal for 2021-2022**

1.Corpus Fund : Last year Corpus fund Rs.5,04,988/- as on 31.03.2021. There is an addition of Rs.2,000/- (2 Members), Thus total Corpus Fund will be Rs. 5,06,988/-. Contribution of Rs.1000/- from member of Bhave family & daughter from Bhave family is formed the corpus.


**Our observations are**

1. It is observed that Treasurer verify the cash balance during the year.
2. Cash limit – Limit for keeping cash in hand should be decided.
3. During the period under Audit Bhave Kulsammelan was not conducted due to COVID 19 pandemic.
4. It is suggested that Trust should distribute interest received on Swanidhi Deposits as per rules.

For Bhave & Bhave Associates
Chartered Accountants
FRN 118631W
UDIN : 22044254AREXMG9654

CA R. S. Bhave
Partner

# सहवेदना



**अविनाश श्रीपाद भावे, पुणे** यांचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी निधन झाले. त्यांनी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत चार वर्षे नोकरी केली. नंतर ते एस.पी कॉलेज, पुणे येथून रसायनशास्त्र विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाले. १९९३ साली त्यांनी डॉ.बी.व्ही.भिडे फाऊंडेशनची स्थापना करून बी.एस्सी. पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी एक वर्षाचा इंडस्ट्रियल ॲनॅलॅटिकल केमिस्ट्रीचा अभ्यासक्रम सुरू केला.

आयुर्वेदात त्यांनी केलेल्या संशोधनाला पारंपरिक आशियाई स्वास्थ्य परिषद, भारत सरकार यांच्यातर्फे गोपालदास पारिख पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी उर्मिला, मुलगा अमित, सुन मीनल, मुलगी अपर्णा, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



**सौ. कांचन श्रीवल्लभ फडके, पुणे** भाव्यांची माहेरवाशीण यांचे वयाच्या ४६ वे वर्षी प्रदीर्घ आजाराने दि. ५ जानेवारी २०२३ या दिवशी निधन झाले. त्या कै. प्रभाकर दिनकर भावे डोंबिवली यांच्या कन्या. त्या उत्तम सुगरण होत्या. वडिलांचा वारसा चालविणाऱ्या मातीच्या मूर्ती घडवणे व विविध कला निपुण होत्या. शांत, सुस्वभावी, मनमिळावू, प्रेमळ, लाघवी, कुटुंबवत्सल असा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या पश्चात पती श्रीवल्लभ, मुलगा कु. वेदांत, तीन दीर, जावा, पुतणे, सासरे वय ९० वर्षे असा परिवार आहे.

मृतांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# भावे मित्र मंडळ, एक परिवाराचा सदस्यत्त्व आणि स्वनिधीचा उपक्रम.

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून संस्थेचे सदस्य होण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व कौशिक गोत्री चित्पावन भाव्यांनी मंडळाचे सदस्यत्व स्वीकारावे असे आवाहन भावे मित्र मंडळाकडून वेळोवेळी केलेले आहे. याला प्रतिसाद म्हणून अनेकांनी अगदी लहानग्या मुलांसह सदस्यत्व स्वीकारले आहे. **डिसेंबर २०१८ मध्ये उज्जैनला झालेल्या संमेलनातील निर्णयामुळे सदस्यत्त्वाची रक्कम आता एक हजार रुपये झाली आहे.**

जुलै, २००८ मध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भावे मित्र मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी संस्थेचे सदस्य वाढविणे व स्वनिधी वाढविण्याबाबत खालील निर्णय झाले. १) शिक्षण व तत्सम सहकार्य, २) व्यावसायिक सहकार्य/ व्यवसायाकरिता कमी व्याजदरात भांडवल पुरविणे ३) वैद्यकीय कारणांसाठी सहकार्य, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत (परत बोलीच्या तत्वावर) ४) आपत्कालीन सहकार्य अशा कारणांसाठी आणि भावे मित्र मंडळाच्या कार्यालयीन व्यवस्थापनासाठी स्वनिधी जमवावा असे ठरले. **प्रत्येक कमावत्या व्यक्तीने रु. ५०००/- स्वनिधीसाठी द्यावेत** असे आवाहन केले गेले. यापेक्षा अधिक रक्कम दिल्यास स्वागतच आहे असेही आवाहन कार्यकारिणीने केले होते. त्यानुसार अनेकांनी स्वनिधीसाठी भरघोस निधी देऊन चांगला प्रतिसाद दिला. अनेकांनी एक रकमी रु.५०००/- देण्यास असमर्थता दर्शवल्याने रक्कम हप्त्याने स्वीकारण्याचीही योजना समोर आली.

भावे मित्र मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे यांनी प्रत्येक भावे कुटुंबाकडून रु. १०००/-(रु. एक हजार फक्त) वार्षिक वर्गणी दरवर्षी घ्यावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला अभय शंकर भावे यांनी अनुमोदन दिले. कुलबंधूंचे उपलब्ध असलेले संपर्क पाहता तीन हजारांपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ती आहेत. **या आवाहनास मान देऊन अनेकांनी सदस्यत्त्व स्वीकारले आहे, तसेच स्वनिधीही दिलेला आहे.**

**आपणही सदस्यत्त्वाची रक्कम रुपये एक हजार व वार्षिक वर्गणी रुपये एक हजार देऊ शकता किंवा खाली दिलेल्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम ट्रान्सफर करावी अशी विनंती आहे.**

**बँकेचे डिटेल्स याप्रमाणे आहेत. Bank Name** - IDBI Bank, **Branch** - Deccan Gymkhana, Pune. **Account Name** - Bhave Mitra Mandal, **Saving A/C Number** - 50210010010723, **IFSC** - IBKL0000502. **रक्कम ट्रान्सफर केल्यावर अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव व पत्यासह कळवावे म्हणजे पावती मेलने पाठवता येईल.**

# भावे मित्र मंडळाचा एक उपक्रम - भावे शिक्षण निधी

भावे मित्र मंडळाच्या बैठकीत शिक्षण निधीच्या वाढीसंबंधी काय करता येईल याबद्दल नेहमीच विचार विनिमय चालू असतो.

पहिला कुलवृत्तांत सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने जो निधी शिल्लक उरला होता, त्या रकमेचा विनियोग कसा करावा या कल्पनेतून भावे शिक्षण निधीचा विचार पुढे आला. अनेक कुलबंधूंचे पाठिंब्याने 'भावे शिक्षण निधी'ची स्थापना झाली. जवळजवळ सत्तर वर्षे हे कार्य पहिला कुलवृत्तांतकर्ते गोविंद वासुदेव भावे व त्यांचे सहकारी, पुढे त्यांचे चिरंजीव मधुसूदन गोविंद भावे यांनी चालवले. भावे मित्र मंडळाची स्थापना झाल्यावर २००८ साली भावे शिक्षण निधी हा भावे मित्र मंडळात समाविष्ट झाला. त्यानंतर कामास थोडा वेग आला. आता मंडळाच्या त्रैमासिकातून दरवर्षी निवेदन दिले जाते व भावे कुलोत्पन्न गुणवान विद्यार्थ्यांना पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. असे असले तरी अजून मोठ्या प्रमाणात या निधीमध्ये भर पडल्यास, वाढत्या महागाईच्या काळात वाढलेल्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करणे शक्य होईल.

भावे शिक्षण निधीतून आजवर अनेक विद्यार्थ्यांना मदत मिळाली आहे. ही मदत 'फूल ना फुलाची पाकळी' अशा स्वरूपाची आहे हे मान्य केले तरी विद्यार्थ्यांना त्या त्या वेळी जी मदत झाली आहे त्याबद्दल अनेकांना कृतज्ञता वाटते व ते स्वाभाविकही आहे. ही मदत थोडी असली तरी आपल्या कुलाने प्रेमाने व आपुलकीने दिलेला तो प्रोत्साहनपर आशिर्वाद आहे ही भावना अनेक कुलबंधूंशी बोलताना लक्षात आली.

**ही भावना लक्षात घेता ज्या भावे कुल बंधू भगिनींना अशी मदत अल्पस्वल्पही का असेना, मिळाली आहे त्यांचेसाठी विनंती वजा आवाहन करीत आहोत की आता जे कुलबंधू आर्थिकदृष्ट्या स्थिरावले आहेत त्यांनी 'भावे शिक्षण निधी'स सहाय्य करून हा निधी वाढवण्याचे कामी पुढाकार घ्यावा. एक कल्पना अशी आहे की प्रत्येकाने दरवर्षीची योजना निश्चित करून तशी रक्कम तयार ठेवून ही रक्कम 'भावे शिक्षण निधी'स देणगीचे स्वरूपात द्यावी. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा भावे मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही अशी योजना आपणास तयार करता येईल.**

अर्थात ज्यांनी विद्यार्थीदशेत या निधीतून काही सहाय्य घेतलेले नाही अशांनीही शिक्षण निधीस सहाय्य करण्यासाठी हे निवेदन आहे हे सांगणे नकोच. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे हा निधी वाढीला लागेल असा विश्वास वाटतो. सर्वांनी मनावर घेतले तर हे काम सोपे होईल. 'केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे !' अधिक काय लिहावे !

**अध्यक्ष, भावे मित्र मंडळ**

**शिक्षण निधीच्या देणगीची रक्कम आपल्याला बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करता येईल. त्याचा तपशील खाली दिला आहे.**

**Bank Name -** Janata Sahakari Bank, **Branch -** Karve Road, Pune., **Account Name -** Bhave Mitra Mandal (Ek Pariwar) A/C Bhave Shikshan Nidhi, **Saving - A/C Number -** 007220100038846, **IFSC Code -** JSBP0000007

**रक्कम ट्रान्स्फर केल्यावर पर्शराम भावे (९४०३५१६८७५) किंवा अभय भावे (९४२२३०६०३३) यांना कळविणे आवश्यक आहे.**

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

© ॲड. दिनकर परशराम भावे, मुंबई.

### मायेसाठी माय दे। वारीसाठी पाय दे।

**पूर्वसंदर्भ –** वंदनीय लक्ष्मीबाई उपाख्य मावशी केळकर (म्हणजेच पूर्वाश्रमीच्या कमल भास्करराव दाते) या राष्ट्र सेविका समितीच्या आद्य प्रमुख संचालिका. त्यांचे ध्येय अखिल हिंदू महिलांचे संघटन करून तेजस्वी राष्ट्र निर्माण करणे. समितीचे कार्य देशभर विस्तारण्यासाठी धडाडीने कार्य करणाऱ्या अनेक महिलांची त्यांना साथ मिळाली अशा अनेक कर्तृत्ववान कार्यकर्त्यांच्या मांदियाळीत ज्यांचा आवर्जून उल्लेख अनिवार्य असेल त्यात वंदनीय ताई आपटे, बकुळ देवकुळे, श्रीमती सुशीला वैद्य (पूर्वाश्रमीच्या अहिल्या परशराम भावे), सौ. सुशीला महाजन आणि अन्य निष्ठावान सेविका.

श्रीमती सुशीला वैद्य (पूर्वाश्रमीच्या अहिल्या परशराम भावे) यांच्या जन्म शताब्दीनिमित्ताने (१६ जानेवारी १९२०-१६ जानेवारी २०२०) त्यांच्या कर्तृत्त्वाची ओळख त्यांचे कनिष्ठ बंधू दिनकर परशराम भावे, वकील, यांनी आदरांजली मार्फत आप्तेष्टांना करून दिली होती, तो लेख खाली उधृत केला आहे.

मी खूप छोटासा-छोटासा म्हणजे साडेतीन/पावणेचार वर्षाचा असताना माझ्या आईचा आणि माझा सहवास संपला(ऑक्टोबर १९३८)! मला आईचा चेहरा देखील आठवत नाही. सोबत दिलेला माझा आणि आईचा एकमेव फोटो असेल. आई गेली त्यावेळी तिचे वय अवघे २९ वर्षे होते. लौकिक अर्थाने चार बुकं देखील न शिकलेली, पण व्यवहार ज्ञान, सामंजस्य आणि कणखरपणा ह्यांची उपजत देणगी तिला प्राप्त असावी. इतक्या लहान वयात तिची प्रगल्भता वाखाणण्यासारखी म्हणावी लागेल. आम्ही एकत्र कुटुंबात होतो तरी तिन्ही मुलांची देखभाल आजन्म केली जावी म्हणून कायमचा निरोप घेण्यापूर्वी तिने नियोजन केले असे सर्व सांगतात. वडील बंधूंना ती.ताईचे (मुक्ताबाई-इंदिरा भागवत) पदरात टाकले तर मला ती.माईचे (अहिल्या-सुशीला वैद्य). येसूबाईचा विवाह झाला की सासरची मंडळी बघतील, असा सरळसरळ हिशेब. पण एक गोष्ट मला सातत्याने आजही जाणवते की तिने, माझ्या आईने, माझ्यावर माया करण्यासाठी सातत्याने कुणाची तरी नियुक्ती करून ठेवलेली आहे.



अशा प्रकारे मायेसाठी माय देऊन माझी आई निघून गेली.

ती.माईच्या संदर्भात अनेकविध आठवणी आहेत. आणि आजही त्या तितक्याच ताज्या, टवटवीत आणि सुगंधी आहेत. पण लेखनाची मर्यादा असल्याने त्यातील निवडक प्रसंग, विषय आणि आशय मांडणार आहे.

मला असं सांगण्यात आलं की ठाणे येथील भावे चाळीतील आमच्या घराच्या बाजूच्या लोखंडी जिन्यावरून ती.माई उतरत असताना तिच्या कडेवरून घरंगळत मी खालच्या पायरीवर येऊन आपटलो आणि उजव्या डोळ्याच्यावर कपाळावर खोक पडली. ती खूण आजन्म माझी पाठराखण करील. ती.भाऊ(वडील) हे बोरीबंदर येथील मुंबई महानगरपालिकेमध्ये नोकरी करीत असल्याने मला फणसवाडीत ती.माईचे घरी सोडून ३/४ दिवसांनी परत घेऊन जात असत. मला तिच्या घरी राहायला खूप आवडत असे. तिच्याकडे गेलं की मज्जा असे. मोटारीतून फिरावयाचे, चौपाटीवर भेळपुरी, कुल्फी, आईस्क्रीम वगैरे खाऊन घरी यावयाचे. उन्हाळ्याच्या सुट्टीत रोज हापूस आंबा मिळे. या गमती जमती लहानपणीच्या झाल्या.

पण नंतर आम्ही १९४३ साली पुण्याला रहावयास गेल्यावर वर्षातून एकदा ८/१५ दिवस ती पुण्याला येत असे. येताना मला खाऊ, एक सिल्कचा रुमाल आणि काही वेळा स्वहस्ते विणलेला रंगीबेरंगी स्वेटर आणीत असे. चांगलेचुंगले पदार्थ बनवून खाऊ घालत असे. तिने केलेल्या अनेकविध पदार्थांमध्ये लक्षणीय गोड केशरी भात, साखर भात याची अप्रतिम चव, मला आजही आठवते.

नियतीने आमची गाठ बांधली असल्याने तरुणपणी पुन्हा मी तिच्या सान्निध्यात आलो. सन १९५८ साली मुंबईत नोकरी लागल्याने या महानगरीत पाय ठेवण्यासाठी पहिली पसंती फणसवाडी. तिच्याकडे मी ७/८ महिने राहिलो. वैद्य कुटुंबियांनी माझा स्वीकार केला, पण तिला अवघडल्यासारखे वाटू नये ह्याची दक्षता मी घेतली होती. 'रंगांत रंगुनी रंग माझा वेगळा, गुंत्यांत गुंतुनी पाय माझा मोकळा' अशा पद्धतीने मी राहिलो. नंतर मला सरकारी वसाहतीत बांद्र्याला घर मिळाले. पण १/२ महिन्यात मला मुदतीचा ताप (टायफॉइड) आला. पुन्हा फणसवाडी. १०/१५ दिवस ती.माईने माझी आईप्रमाणे सेवा केली. जानेवारी १९६० अखेरीस पुण्याला गेलो. ताप उलटला आणि पुन्हा ८/१० दिवस ज्येष्ठ भगिनीला (मुक्ताबाईला-इंदिरा भागवत) माझी सेवा करावी लागली. खरंतर ती देखील माझी माय होती, कारण १९४३ साली माझी मुंज झाली तेव्हा तिच्या मांडीवर बसून मातृभोजन केल्याचे मला स्मरते.

हरिदासाची कथा मुळपदावर आणतो. तरुणपणी मी ती.माईच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू पाहिले, अनुभवले.

**निगर्वीपणा –** अहिल्या भावे ह्या सौ. सुशीला वैद्य झाल्या. ऐश्वर्य पायाशी लोळण घेत असताना डोक्यात कसलीही हवा गेली नाही. जगन्नाथ चाळीत पहिला फोन (त्याचा नंबर ३०४७५, आजही आठवतो), पहिली मोटारगाडी, पहिला फ्रीझ इत्यादी सर्व प्रथम वैद्य कुटुंबात आले. पण आमची माई साध्या नऊवारी साडीत. ती देखील भारीची नाही.

**दांडगी स्मरणशक्ती –** कविता, श्लोक, भावगीते, निरनिराळी स्तोत्रे सर्व मुखोद्गत. गाण्याच्या भेंड्या असल्या की ती ज्यांच्या बाजूला त्यांचे पारडे जड.

**शिक्षणाची आवड –** रात्रीच्या शाळेत जाऊन मॅट्रिकपर्यंत ती शिकली. शिक्षणाला प्रोत्साहन देणे, सहाय्य करणे हे उद्देश ठेवून आळंदी येथील संस्कृतमध्ये वेदपठण शिकविणाऱ्या एका संस्थेला तिने रुपये दहा हजार (रु. १०,०००) देणगी दिली, पण ती देणगी होती ती.भाऊसाहेब भावे (पिताश्री) यांचे नावे! त्यांचे पुण्यतिथीला (३१ ऑक्टोबर) सर्व विद्यार्थ्यांना आणि गुरुजननांना दिल्या जाणाऱ्या भोजनाचा (अन्नदान) खर्च व्याज रकमेतून करावा अशी संकल्पना! एका वर्षी आम्ही कुटुंबियांनी प्रत्यक्ष भेट दिली. वेदपठण कसे केले जाते त्याचे जिवंत प्रात्यक्षिक आम्ही ऐकले, सहभोजन करून परतलो.

**जिद्द, कणखरपणा –** लग्नाला जेमतेम सहा महिने झाले असताना सासरच्या मंडळींसमोर सत्याग्रह करून आईच्या अंत्यदर्शनास जाण्याची

परवानगी मिळविली (ही गोष्ट ऐकीव, बरका).

**आत्मनिर्भर महिला** – शिवणकला वर्ग. घरी मोठी जागा होती.. ५/६ शिवणयंत्र आणून अनेक महिलांना शिक्षित केलं, स्वत:ला दोन पैसे मिळावे म्हणून नाही तर त्या शिकलेल्या महिलांना स्वत:च्या संसाराला आर्थिक सहाय्य मिळावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात हा उद्देश.

**समाज प्रबोधन** – पारंपारिक प्रथेप्रमाणे नारदीय कीर्तन हे एक अतिशय प्रभावी माध्यम असल्याचे सर्वमान्य होते.. वय वर्षे ६०. पण दांडगा उत्साह, जिद्द आणि जबरदस्त आत्मविश्वास. पुण्याच्या शिक्षण संस्थेने ती.माईला वर्गात नाखुशीने परवानगी दिली. आणि अहो आश्चर्यम, ती.माई प्रविण्यासह परीक्षा उत्तीर्ण झाली. यथावकाश काळाराम/गोराराम मंदिरांमध्ये (ठाकुरद्वार) आणि इतर अन्य ठिकाणी कीर्तनाद्वारे प्रबोधन केले. अनेक शतकांची परंपरा असणाऱ्या नारदीय कीर्तनकाराचे प्रबोधन हे केवळ नामस्मरण आणि त्याचा घोष विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल करणे इतके मर्यादित स्वरूपाचे नसते, तर सुसंस्कार रुजविण्याचे असते. शिक्षित आणि सुसंस्कारित ह्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. संस्कारांमध्ये जीवन मूल्ये, नैतिक मूल्ये यांची जाण निर्माण करणे आणि कर्तव्यदक्ष, जबाबदार माणूस घडविणे येते, केवळ पुस्तकी पठणाने हे ज्ञान मिळत नाही. आणि माझ्या मायेला ह्या परंपरेचा आधार घेत तेजस्वी राष्ट्र निर्माण कार्याचे स्वप्न अशा सुसंस्कृत स्त्री-पुरुषांचे सहाय्याने प्रत्यक्षात साकार करावयाचे होते.

**राष्ट्रीय कॅडेट कोअर (एन.सी.सी.)** – त्या दलाचा गणवेश घालून प्रशिक्षण घेतले. पुढे जाऊन समितीच्या प्रशिक्षण वर्गात त्याचा उपयोग झाला. त्या दलाची प्रतिज्ञा अशी – ...We resolve to be disciplined and responsible citizens of our nation. We shall undertake positive community service in the spirit of selflessness and concern for our fellow beings.

**राष्ट्र सेविका समिती** – तेजस्वी हिंदू राष्ट्र पुनर्निर्माण हे स्वप्न घेऊन श्रीमती लक्ष्मीबाई केळकर (मावशी) यांनी १९३६ साली वर्धा येथे जे लहानसे रोपटे लावले, त्याला नि:स्वार्थ सेवा आणि समाजऋणाची जाण ठेवणाऱ्या अनेक सेविकांनी खतपाणी घालून वटवृक्षात रूपांतरीत केलं त्यात विशेष उल्लेखनीय असा वाटा ती.माईचा देखील होता.

ठाण्याला 'जिजामाता ट्रस्ट' ही वास्तू उभारण्यात तिने मोलाची कामगिरी बजावली. पण तिची खरी ओळख आणि स्मरणीय कामगिरी म्हणजे उद्योग मंदिर संकल्पना कार्यान्वित करून १०-१५ वर्षे शिस्तबद्ध पद्धतीने चालवून पाया भक्कम करणे. त्या साठी तिने तन, मन, धन वेचून अविरत कार्य केलं. हळद, तिखट मोहरी, मसाले असे पदार्थ विकत घेऊन समितीच्या केंद्रांवरून वाटप करणे असा उपक्रम. शेतकरी, व्यापारी यांचे बरोबर बोलणी करणे (ठाणे, भिवंडी, नवी मुंबई असे प्रवास करणे), चोख माल आणि कमीत कमी दाम यापद्धतीने मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून, लहान पिशव्यांमध्ये केंद्रांवर विक्रीस ठेवणे. मग पैशांचे हिशेब ठेवणे. पण हे करताना उद्देश एकच, महिलांना काम आणि आर्थिक सहाय्य मिळावे. आणि हे सर्व सेवाभावी वृत्तीने ती.माईने पार पाडले.

**संतसदृश वारकरी** – ह्या सप्तकोनी, सप्तरंगी सोन्याच्या कोंदणात विराजमान आहे ती चमचमणारी, संतांच्या मांदियाळीतील शोभून दिसणारी एक हिरकणी. पांडुरंगाचा जप करीत सुमारे २० वर्षे दिंडीबरोबर पायी चालणारी माझी माय ती.माई (वैद्यांची सुशीला) ही विचारांची आणि भावनेची श्रीमंती जपणारी सच्ची वारकरी होती. परब्रह्माला साठवीत साठवीत विवेकाच्या दिशेने होणारी उन्मत्त वाटचाल म्हणजे पंढरीची वारी, असं यथार्थ वर्णन डॉ. रामचंद्र देखणे यांनी केले आहे. ते पुढे म्हणतात, मानवी जीवनात परिवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. बहुतेक क्रियांमध्ये साधन खडतर असते, तर साध्य आनंदरूप असते. वारीच्या वाटचालीत साधन आणि साध्य दोन्हीही आनंदरूपच. ज्ञानरूप परमात्मा हे साध्य, तर भक्तिरूप वाटचाल हे साधन. अद्वैताचे चिंतन तत्त्ववेत्ते करतात; पण त्याची अनुभूती मात्र वारकरी घेतात. पंढरपूरच्या वारीला शेकडो वर्षांची परंपरा आहे. आजही लाखो वारकरी, शेकडो दिंड्या, पताका, टाळकरी, तुळशी वृंदावन आणि पाण्याचा हंडा घेतलेल्या महिला वारकरी, चोपदार हा सारा भक्तिप्रेमाचा लवाजमा पाहिला, की ज्ञानोबा-तुकोबांवरील वारकऱ्यांच्या भक्तिप्रेमाचे वैश्विक दर्शन घडते. नामगजर, हरिपाठ, गौळणी, भारूड, पाडली, पदन्यास, धावा, रिंगण या सगळ्याच प्रकारातून अध्यात्माच्या भक्ति खेळाचे स्वाभाविक रूप उभे राहिले.

दर आषाढीला सुमारे २५० किलोमीटर पायी प्रवास २१ दिवस सातत्याने करीत पांडुरंगाचे दर्शन ती.माई घेत असे. तिचे हे सहावे सुख म्हणावे लागेल. सर्व जीवन अमुलाग्रपणे बदलून टाकणारा अनुभव तिने घेतला त्याला तोड नाही. ती हा अनुभव सांगताना तल्लीन होऊन वर्णन करीत असे. रिंगण घोडा कसा धावतो कोणालाही इजा न करता, त्याच्या मागे अदृश्यशक्ती वावरत असते इत्यादी. हे दृश्य मनोहारी निश्चितच म्हणावे लागेल.

तिने सर्व आयुष्य समर्पित केलं ते इतरांना सुख मिळावे म्हणून. काही 'इदं न मम' राष्ट्राय स्वाहा म्हणत, तर काही कुटुंबियांसाठी! कोणी अडचणीत असेल त्याच्या मदतीला ती धाऊन जाई. जणू अग्निशामक दलाचा बंब!!

**जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।।**
**तोची साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।**

खरा साधू म्हणजेच संत जो असतो त्याच्या अंत:करणात रंजल्या गांजल्या लोकांबद्दल असीम करूणा असते. तुकाराम महाराजांनी अशा मृदू अंत:करणाचे वर्णन करण्यासाठी लोण्याची उपमा वापरलेली आहे. लोणी जसे अंतर्बाह्य मऊच असते तसेच संतांचे अंत:करण असते. माझी माय सर्वांगाने संतांच्या जात कुळीतली!

तर काय सांगत होतो, महाराजा, की भावे यांचे अंगणातील अहिल्या नामक तुळस ही वैद्यांच्या अंगणात सुशीला नावाने रुजली, वाढली आणि फोफावली देखील! आणि स्वकर्तृत्त्वाने, मेहनतीने, कष्टाने, कृतीने तिने हे सिद्ध करून दाखविले की वंशाला कुलदीपक (मुलगा) हवा ही संकल्पना कालबाह्य झाली असून वंशाचे, कुलाचे नाव कन्यारत्न देखील तितक्याच ताकदीने करू शकते; नव्हे काकणभर श्रेष्ठ रीतीने करते. कन्या ही विवाहोत्तर सासरी जाते आणि म्हणून ती माहेर/सासर अशा दोन कुलांचे नाव रोशन करते. मुलगा स्वत:च्या कुलाचे नाव रोशन करतो. हा महान संदेश जर तिच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने घरोघर पोहोचला तर तिला मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार दिला असे होईल.

ती.माईच्या अलौकिक कर्तबगारीचा उंचावत गेलेला आलेख पाहता, तिच्या मंगलमय आणि आनंददायी जन्मशताब्दी सोहळ्याला माता आणि पिताश्री उपस्थित राहून स्वर्गातून सुगंधी द्रव्य आणि सुगंधी फुलांची पुष्पवृष्टी करून आमचा आनंद सहस्त्रगुणीत करतील आणि आम्हा सर्वांना शुभंभवतु असा प्रेमळ आशीर्वाद देतील असा मला दृढविश्वास वाटतो.

अशा बहुरूपी, बहुगुणी आणि बहुआयामी मायेचे वर्णन मी करणे म्हणजे ज्योतीने तेजाची आरती असं झालं! माझ्या मायेला पुन्हा एकदा साष्टांगप्रणीत त्रिवार विनम्रवंदन करून पूर्णविराम देतो.

⌘⌘⌘

**संपर्क :** १५, श्रीकृपा, रामकृष्ण सोसायटी, खेरवाडी,
राम मंदिर रोड, बांद्रा (पू.) मुंबई ४०००५१ **भ्रमणध्वनी** ९८२०५२९३७१

# नूतन

© आनंद वामन भावे, पुणे.

'ओळखलंत का, ओझरकरसाहेब?' सुकृतने समोर पाहिलं, तर निळी जीन्स व गडद निळा फुला-फुलांचा टॉप घातलेली व सोनेरी काड्यांचा, प्रोग्रेसिव्ह लेन्सचा चष्मा लावलेली, साठीची एक महिला त्याला विचारत होती. त्याने क्षणभर विचार केला, मग म्हणाला, 'तुम्ही नूतन साप्ते ना?' तिने हसून मान डोलावली.

मीना ट्रॅव्हल्सतर्फे १४ दिवसाच्या युरोप टूरवर जाणाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांची ही भेट होत होती. सुकृत ओझरकरने लगेच स्वत:च्या पत्नीशी, सौ. चंदाशी, नूतनची ओळख करून दिली. नूतनने तिची मुलगी, जावई देशपांडे व नात यांच्याशी ओळख करून दिली.

सुकृतचे मन एकदम पस्तीस-चाळीस वर्षे मागे गेलं. त्यांच्या बँकेचं कंप्यूटर सेंटर किंवा इलेक्ट्रॉनिक डेटा प्रोसेसिंग सेंटर, ईडीपी सेंटरसुध्दा म्हणायचे त्याला. ईट-ड्रिंक ॲण्ड-प्ले! का? तर तिथे शंभराहून जास्त महिला डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून कामाला होत्या.

१९६७-६८ मध्ये यू.एस. मधील त्यावेळच्या सुप्रसिद्ध कंपनीने मॉडेल १५०२ हा संगणक बँकेला विकला. त्यावेळी संगणकात माहिति भरण्यासाठी विशिष्ट लिपीत भोके पाडलेल्या कार्डांचा (punched cards) वापर होत असे. मात्र, अमेरिकेत ही पद्धत जुनी होत चालली होती. मग काय, विका इंडियाला तो कंप्यूटर व त्याची शंभर-सव्वाशे कार्ड पंचिंग मशीन्स.

वर शहाजोगपणे हेही सांगा की मशीन ऑपरेटर दिवसाला फक्त अमुक एकच कार्ड पंच करू शकते. थोडक्यात ५० ऐवजी सव्वाशे पंचिंग मशीन्स विकत घ्या. लगोलग बँकेने एस.एस.सी. झालेल्या व कार्ड पंचिंग शिकलेल्या मंडळींकडून अर्ज मागवले. तीन मुलगे व १२२ मुलींची निवड झाली.

वर्षभरातच १९६९ मध्ये बँकेचे राष्ट्रीयीकरण झाले. मोठ्या प्रमाणात शाखा वाढल्या. सध्याच्या शद्वात, मेगाभरती झाली. पंच ऑपरेटरसाठीही योजना आली की पाच वर्षे नोकरी झाली की क्लार्क म्हणून कन्व्हर्शन मिळू शकते. ते तिघे मुलगे क्लार्क होऊन निरनिराळ्या शाखांमध्ये गेले. मग पुन्हा नव्या ऑपरेटरर्सची नेमणूक, असे सुरू होते.

१९८० च्या सुमारास सुकृत कंप्यूटर सेंटरला रुजू झाला. त्याचे काम ए. सी.व इलेक्ट्रिकल मेंटेनन्स. राजभाषेत-रखरखाव अभियंता. आठ-दहा इलेक्ट्रिशियन व ए. सी. प्लांट ऑपरेटर, हा त्याचा स्टाफ. कामानिमित्त पंचिंग हॉलमध्ये फेऱ्या व्हायच्या. अनायासे स्टाफकडे लक्ष जायचे. नवीन जॉइन झालेल्या मराठी मुली स्कर्ट-ब्लाऊझ घालत. कॅथलिक मुली मधून-मधून वनपीस ड्रेस सुध्दा घालत. पंजाबी ड्रेसचे मात्र नाव नव्हते.

दोन-तीन वर्षात लग्न झाले की साडी. पुढे बहुधा नवऱ्याच्या परवानगीने स्लीवलेस, अशी पध्दत होती. याच सिस्टिममध्ये नूतन जॉइन झाली ती स्कर्ट-ब्लाऊझमधेच. सुकृतला स्पष्ट आठवतं की गोरी, अंडाकृती चेहऱ्याची, ही हसरी मुलगी, पोपटी फ्लेयर्स म्हणजे बेल-बॉटम्स, हिरवा प्रिंटेड टॉप व दाट केसांची सैलसर वेणी घालून गिरगावातून येत असे. प्रथेप्रमाणे तिचेही लग्न झाले. आपला संबंध नसलेल्या लेडी स्टाफशी स्वत:हून बोलण्याची तेव्हा रीत नव्हती. पण कॅन्टीनमधील बोलण्यातून आपोआप कळत गेलं की तिच्याच चाळीतल्या एका गुजराती मुलाशी तिचा प्रेमविवाह झाला व ती झाली विजया विनयकुमार विरमगामवाला. सुकृतच्या मनात आलं नवऱ्याला नावात अनुप्रास साधायचं वेड दिसतंय. म्हणूनच तिला जाळ्यात ओढलं, गोड बोलून असं चुकचुकणाऱ्या जिभाही होत्या.

लग्नानंतर ऑफिसला परतली तर तिच्यात खरोखर भयंकर वाटावा असा बदल झाला होता. करकचून बांधलेली वेणी. इतकी घट्ट की जरा ओढली तर सर्व केस हातात येतील. ढगळ ब्लाऊझ आणि चेहऱ्यावर अत्यंत बावळट भाव. इतर मुली लग्न होऊन आल्या की टेचात असत. रोज नव्या साड्या नेसत, नवऱ्याच्या नोकरीच्या फुशारक्या मारत. नूतनबद्दल त्याला तेव्हा आपोआप दिसले, कळले ते एव्हढेच. कारण एव्हाना सुकृतला प्रमोशन मिळून त्याची बदली हेड ऑफिसला झाली होती.

प्रत्यक्ष युरोपटूरमध्ये अधिक माहिती होत गेली. सुकृतच्या गप्पा बँकेतल्या सर्व्हिसपुरत्या मर्यादित राहिल्या. कसं तिनं पन्नाशीपर्यंत ऑफिसर व्हायचं टाळलं, नंतर परीक्षा दिली. पास होऊन नेमणूक होईपर्यंत वय झालं पंचावन्न. या वयाला बाहेरगावी बदली न करण्याचा नियम आहे. म्हणून रिटायर होईपर्यंत ती मुंबईतच राहिली.

नूतनच्या गप्पा खऱ्या रंगल्या त्या चंदाबरोबर. सासुरवासाचे, नवरेवासाचे, दाहक अनुभव परस्परांना सांगताना, मधून-मधून भरून येताना, त्यांची गट्टी छान जमली.

नूतनच्या सासऱ्यांचा साड्यांचा होलसेलचा बऱ्यापैकी धंदा होता. विनयकुमारही बी. कॉम. होऊन तिथेच जॉइन झाला. मुंबईत तयार झालेल्या साड्यांच्या एन्जसीज होत्या. अन बरं चाललं होतं. मग आला गिरणगावचा कुप्रसिद्ध संप. कामगारांसह होलसेलर्सचंही कंबरडं मोडणारा.... त्यातून सासरे कधी सावरलेच नाहीत. उदास, निराश होत, ते वारले. विनयकुमारने फुटकळ धंदे करण्याचे प्रयत्न केले, पण त्याला ते जमेना. आता नूतनच एकमेव कमावती.

आधीच चकल्या कडबोळी विरुद्ध फाफडा खाखरा अशी सांस्कृतिक दरी सासूने जाहीर केलीच होती, त्यात सर्व पगार सासूच्या हाती देण्याचे फर्मान निघाले. विरोध करताच सासू अन नवऱ्याने मारहाण केली. कपडे कोणते घालायचे, ते सासूच ठरवायची. म्हणून गबाळावेश. चटपटीत सून पळून गेली तर? हा त्यामागचा विचार. एकदा नूतन न्हाऊन आली तर सासूने तिच्या समोर विजेची बिलं टाकली. बघ तू आल्यापासून वीज बिल किती वाढलंय ते. कशाला तीन बादल्या पाणी घेतेस न्हायला? किती वेळ गीझरची वीज जाळतेस. एका बादलीच्यावर पाणी घ्यायचं नाही सासू करवादली. नूतनचा दाट, लांब केसांचा अभिमान गळून पडला.

विनयकुमार सतत बायको विरुद्ध आईची बाजू घ्यायचा. त्याला हळुहळू दारूचे व्यसन लागले. पैसा तिकडेही जाऊ लागला. मोलकरीण ठेवायची नाही. सर्व काम सुनेनेच करायचे असा खाक्या होता. नूतनने किती खायचं हेही सासूच ठरवायची. उगीच जास्त खायचं नाही. द्यायची ते पोटभरीचंही नसायचं.

यातलं सर्व, विशेषत: सासूनं उपाशी ठेवणं हे चंदानेही अनुभवलं

होतं. नवऱ्याने म्हणजे सुकृतने, सासूची बाजू घेणे हे सुद्धा. म्हणून चंदाकडे नूतन अधिकाधिक बोलत गेली. नूतनला होणारा त्रास बघून तिचे आईवडील खंगत गेले. खाजगी कंपनीतून रिटायर झालेले वडील वारले. जी काही थोडी बचत होती त्यावर आई गुजराण करत होती. दोन-तीन वर्षात तीही वारली. तिची चाळीतली खोली नूतनच्या नावावर झाली.

नवा बिझनेस सुरू करतो या मिषाने विनयकुमारने नूतनला खोली विकायला लावली व पैसे लाटले. प्रेमाचा रंग मनातून अजूनही न उतरलेली नूतन त्याला काहीच बोलू शकली नाही. त्या पैशाचे पुढे काय झालं, किती दारूत गेले, किती दुसरीकडे उधळले, हे तिला कधीच समजले नाही.

जमेची बाजू एकच होती, नूतनची दोन्ही मुले, थोरली मुलगी दक्षा व धाकटा भाविन, ही दोघंही समजुतदार होती. माराच्या भीतीने आजी व बाप यांच्याविरुद्ध बोलत नसली तरी आईला होणारा त्रास त्यांना समजत होता. तुम्ही उत्तम अभ्यास केला तरच ह्या नरकातून बाहेर पडू शकाल हे नूतनचे म्हणणे त्यांनी मनावर घेतले व कसून अभ्यास केला. बँकेच्या स्कॉलरशिपची मदत झाली व बँकेचंच लोन काढून दोघांनी कॉलेज पूर्ण केलं. उत्तम मार्कांमुळे परदेशातही स्कॉलरशिप मिळाली आणि यथाकाल दक्षा अमेरिकेत व भाविन ऑस्ट्रेलियात स्थायिक झाला. आता नूतन दक्षाच्या कुटुंबासह युरोप टूरला आली होती.

नूतन ऑफिसर झाल्या झाल्या सासूला पॅरॅलिसिसचा झटका आला. ऑफिसरकी सांभाळू की सासूला सांभाळू? हा नूतन पुढचा प्रश्न तिच्याच वागणुकीमुळे जवळच्या झालेल्या, बँकेतल्या सहकाऱ्यांनी सोडवला. शेवटी नूतन रिटायर झाल्यावर एक वर्षानंतर सासू वारली. नवरा विनयकुमार आता एकटा पडला होता. तो खरोखरच बेडवर पडून असायचा व दिवसभर माझं अन बाचं (सासूबाई) चुकलं. आम्ही तुला फार छळलं अशी व्यर्थ बडबड करायचा. दारूसाठी पैसे मागायचा. सासू पाठोपाठ दोन वर्षांत तो सुध्दा वारला. दिवस झाल्या झाल्या नूतननं गिरगावातली रीडेव्हलपमेंटला आलेली जागा उत्तम किमतीला विकली. पार्ल्यात चांगल्या सोसायटीत २ बीएचके फ्लॅट घेतला व सहा महिने अमेरिकेत दक्षाकडे जाऊन राहिली. तिथूनंच दक्षाबरोबर ती युरोपटूरला आली होती.

आधी स्मार्ट, मग कित्येक वर्षे बावळट आणि आता पुन्हा स्मार्ट व मॅच्युअर दिसणाऱ्या नूतनची अशी होती तर हकिगत.

आपण नोकरी केली. कित्येक वेळा आता उद्या सस्पेन्ड करणार, अशी वेळ आली. पण चंदाच्या सल्ल्याने निभावलं. 'एरवी आपण आणि आपले आई-वडील यांनी चंदाला असंच, नूतनसारखं, छळलंय की.' सुकृत मनोमन म्हणाला आणि, आता काय केलं की चंदा तो छळ विसरू शकेल, या विचारात तो गढून गेला.

**संपर्क :** ४, श्री अपार्टमेंट, ७९८, सदाशिव पेठ पुणे ४११०३० **भ्रमणध्वनी :** ९९३०२८९३९८

⌘⌘⌘

## साभार कृतज्ञता

**१) अरविंद सदाशिव भावे, मुलुंड, मुंबई यांनी दोन हजार रुपयांची तसेच २) प्रकाश हरिहर भावे, ठाणे यांनी त्यांच्या मातोश्री सुलभा हरिहर भावे यांचे स्मरणार्थ एकवीस हजार रुपयांची देणगी भावे मित्र मंडळाच्या भावे शिक्षण निधीस दिली आहे.**

**भावे मित्र मंडळ सर्वांचे अतिशय आभारी आहे.**

## सहवेदना



**दिलीप हनुमंत भावे, नाशिक** यांचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी अपघातात वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. ते लष्करातून सेवानिवृत्त झाले होते.

जानेवारी २०२० ला नाशिकमध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या संमेलनाचे आयोजन करताना त्यांचे मार्गदर्शन लाभले होते. त्यांच्या पश्चात पत्नी रश्मी, राहुल, अतुल ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची मुले नाशिकला केटरिंगचा व्यवसाय करतात.



**दिगंबर कृष्णाजी भावे, वारखंडे, फोंडा** यांचे दि. १२ डिसेंबर २०२२ या दिवशी वयाच्या ६२ व्या वर्षी निधन झाले. जानेवारी २०१६ ला गोव्यामध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या संमेलनात भोजन व्यवस्थेचे काम त्यांनी उत्तम सांभाळले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुलगी, वहिनी व पुतण्या असा परिवार आहे.



**जयंत रघुनाथ भावे, पुणे,** यांचे दि. १५ डिसेंबर २०२२ या दिवशी वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. पुण्यात इंजिनियरिंग क्षेत्रात त्यांचा स्वतंत्र व्यवसाय होता.



**सुनिता अच्युत भावे, पुणे** यांचे दि. ३० डिसेंबर २०२२ या दिवशी वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात मकरंद व मिलिंद ही दोन मुले, सून, विवाहित मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मृतांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**विशेष निवेदन** – भावे मित्र मंडळाकडे भावे व माहेरवाशीणींचे पत्ते व फोन नंबर्सचा जो डाटा आहे, तो २००७ सालचा आहे. त्यात होणारे बदल अपडेट करण्याचे काम सतत चालू असतेच. आपली नवीन पिढी नोकरी-व्यवसायामुळे अन्य ठिकाणी निवासाला गेली असल्यास त्यांचे पत्ते, भ्रमणध्वनी व ई-मेल ॲड्रेस मंडळाला जरूर कळवावेत म्हणजे भावे मित्र मंडळाचा डाटा अपडेट होईल. पत्ते, भ्रमणध्वनी व ई-मेल ॲड्रेस **पर्शराम भावे, पुणे. भ्रमणध्वनी ९४०३५१६८७५ व अभय शंकर भावे, पुणे. भ्रमणध्वनी ९४२२३०६०३३ यांना** WhatsApp **वर किंवा मेसेजने कळवावेत.**

## दुर्लक्षित आचार्य बाळशास्त्री जांभेकर

**प्रतिनिधी, मुंबई –** स्कॉटलंडच्या युनिव्हर्सिटीमध्ये एका भारतीय व्यक्तीचा २०० वर्षांपूर्वी लिहिलेला अर्ज आदरपूर्वक जतन करून ठेवलेला आहे. नामवंत एल्फिन्स्टन कॉलेजच्या प्राध्यापक पदासाठी केलेला तो अर्ज होता. नोकरीचा किरकोळ अर्ज संग्रहालयात ठेवण्याइतपत प्रभावीपणे मांडणाऱ्या एका मराठी बुद्धिवंताचा थोडक्यात परिचय.

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या पारतंत्र्यात भारत सखोल बुडालेला असतानाच ६ जानेवारी १८१२ साली आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात वाघोटन खाडीच्या किनाऱ्यावर पोंभुर्ले गावी झाला. या गावात अतिशय गरीब कुटुंबात त्यांचे बालपण गेले. हालाखीची परिस्थिती असतानाही आई सगुणाबाई आणि वडील गंगाधरशास्त्री यांनी त्यांना शाळेत घातले आणि पुढे इतिहास घडला. जन्मजात अफाट बुद्धिमत्ता लाभलेले बाळशास्त्री शालेय जीवनात प्रचंड वेगाने विद्याभ्यास करू लागले. पाठांतर दांडगे असल्यामुळे स्वत:च्या इयत्तेतील पुस्तके समजून घेतल्यानंतर पुढच्या दोन दोन इयत्तांमधील अभ्यास ते एकत्रितरीत्या करू लागले. त्यांची तल्लख बुद्धिमत्ता पाहून सर्वजण त्यांना बालबृहस्पती म्हणू लागले. १८२६ साली त्यांनी मुंबई एजुकेशन सोसायटी या इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला. त्यांच्या सखोल अभ्यासामुळे वयाच्या १४ व्या वर्षी त्याच शाळेत गणिताचे शिक्षक म्हणून त्यांना नोकरी मिळाली आणि ती सुद्धा पगारी. परंतु फक्त गणितेय बुद्धिमत्तेपुरते आपले ज्ञान त्यांना मर्यादित ठेवायचे नव्हते आणि त्यामुळेच विविध भाषा शिकण्याचा त्यांनी सपाटा सुरू केला. जिज्ञासेमुळे अल्पावधीतच मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू, इंग्रजी, पारशी, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक, उर्दू या सर्व भारतीय आणि परदेशी भाषांवर त्यांनी प्रभुत्त्व मिळविले. हे कमी पडले म्हणून की काय त्यांनी खगोलशास्त्राचा अभ्यास सुरू केला आणि त्यातही ते पारंगत झाले. ज्योतिष्यशास्त्रावर सुद्धा त्यांनी आपली पकड घट्ट केली. बॉंबे नेटिव्ह सोसायटीचे बापू छत्रे हे त्यांचे शिक्षक.

१८३० साली वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी बाळशास्त्री बॉंबे नेटिव्ह सोसायटीचे 'डेप्युटी सेक्रेटरी' झाले. १८३४ साली एल्फिस्टन महाविद्यालयाची स्थापना झाली. त्या महाविद्यालयात रुजू होणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे पहिले मराठी सहाय्यक प्राध्यापक. गणित, भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र हे अवघड विषय ते शिकवायचे. दादाभाई नवरोजी, भाऊ दाजी लाड हे आचार्य बाळशास्त्री यांच्या हाताखाली शिकून गेलेले काही महान विद्यार्थी. एल्फिस्टन महाविद्यालयात रुजू होण्यापूर्वी आपल्या जन्मदिनी ६ जानेवारी १८३२ साली त्यांनी 'दर्पण' हे द्विभाषिक वर्तमानपत्र मुंबईत काढले. महाराष्ट्रातील हे पहिले मराठी वर्तमानपत्र !

त्यापूर्वी १७७९ पासून 'बॉंबे हेरॉल्ड' हे महाराष्ट्रातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र उपलब्ध होते. परंतु मराठी भाषेमध्ये दर्पण हेच पहिले वर्तमानपत्र बनले. एका बाजूला इंग्रजी आणि दुसऱ्या बाजूला मराठी मजकूर अशा दोन भाषेत हे वर्तमानपत्र होते. जांभेकरांचे वर्गमित्र भाऊ महाजन त्यातील इंग्रजी भाग संपादित करीत. सुरवातीला दर्पण हे पाक्षिक होते. ४ महिन्यांनंतर ते साप्ताहिक बनले. दर्पणचा खप ३०० प्रति इतका अत्यल्प असला तरी त्या काळात इतर प्रतिथयश वृत्तपत्रांचा अधिकतम खप ४०० प्रति इतकाच होता. दर्पणमुळे मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रचली गेली. पहिले मराठी पत्रकार होण्याचा मान अर्थातच आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना त्यांच्या दूरदृष्टीमुळे मिळाला. ते 'दर्पणकार' या नावाने आजही ओळखले जातात आणि त्यांचा जन्मदिवस ६ जानेवारी हा 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

**महत्त्वाची वैधानिक सूचना –** 'भावे-प्रयोग' या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे सर्व लेखनाधिकार त्या त्या लेखकांकडे आहेत. या अंकातील साहित्य अन्यत्र प्रकाशित करण्यापूर्वी त्या त्या लेखकांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. – संपादक.

**संपादक मंडळ : अभय शंकर भावे, संपादक**
शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पर्शराम गोविंद भावे,
उदय नारायण भावे, शिल्पा मंदार भावे. (सल्लागार)

प्राजक्त

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले.

**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 0231-2540427**

**email -** prajakaweekly@gmail.com

RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**

**Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS**